# गाज

शरद साटम

म. ग्रं. सं. ठाणें
विषय क्रा१०४
सं. क्र. २३०६



REFBK-0021641
REFBK-0021641

काव्य
संदर्भ
२१६४१
३०/३/८८
काव्य
२३०६
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३०६
ग्रा. क्र.
गाज २१६५७ काव्य

# गाज

शरद साटम

REFBK-0021641

REFBK-0021641

मौज प्रकाशन : २४५
पहिली आवृत्ती : ऑगस्ट १९७६
© १९७६ शरद साटम
किंमत दहा रुपये पंचवीस पैसे

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

---

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई
४०० ००४

प्रकाशक :
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई
४०० ००४

आ० ना० पेडणेकर यांस

जून १९५६ ते डिसेंबर १९७४ ह्या कालावधीतील निवडक कविता या संग्रहात एकत्रित केल्या आहेत. त्या जशा लिहिल्या गेल्या, त्याच क्रमाने (काही अपवाद वगळता) छापल्या आहेत. पहिल्या दोन कविता अनुक्रमे १९५६ व १९५७ सालच्या आहेत. सर्वाधिक वीस कविता १९६६ मधील आहेत. फक्त १९७१–७२ मध्ये काहीही लिहिले गेले नव्हते. शेवटच्या चौदा कविता १९७४ मधील.

---

संहितेत पुढील महत्त्वाच्या दुरुस्त्या करून घ्याव्या : पृष्ठ १ वर सातव्या ओळीत 'भिजत' ऐवजी 'भिजट'; पृष्ठ ३५ वर दहाव्या ओळीत 'तूंच' ऐवजी 'तूं'; पृष्ठ ३८ वर सातव्या ओळीत 'निवाला' ऐवजी 'निवालों' आणि पृष्ठ १०९ वर एकोणिसाव्या ओळीत 'उकलणारच' ऐवजी 'उचकणारच'.

अशीच यावी १
आज फुलत्या मनाला २
नाही म्हटलें तरीही ३
गाज ४
आलेख : कवितेचा ५
बगळा ५
ती कांही बोलणार होती ६
अंधाराची वाट ७
फक्त ८
रंग कोणत्या रक्ताला ८
चेटुक ९
अपेक्षा ९
आता रात आकाशाची १०
माणूस ११
तूं जन्माचा वैरी माझा १२
ते १३
ते जिंकले १४
बसलेला १५
अकर्मावस्था २५
आलेख : तिच्या स्वभावाचा २६
रस्ता २७
ही वाळू २८
चाळ २९
अर्धी झोप ३०
दुपार ३१
सुखदुःख ३२
संपूर्ण आयुष्याचा अर्थ ३३
सोहाळे ३४
कांही बोललों असेन ३५
व्यापताप ३६
प्रतिमा ३७
शब्दांच्या वाळूने ३८
श्रद्धा ३९
हिशेबी ४०
चिमणी ४१

---

जगणारे १६
सत्य १७
स्वच्छ तिच्या १८
संसार १९
रंग त्यांच्या जीवना आलाच नाही २०
वयपरत्वें २१
लिहावयाचें २२
मनांत वारा वाजुन गेला २३
जगण्याइतुकें २४
साद ४१
रे! ४२
दिशा ४३
व्यथा ४४
गृहस्थधर्म ४५
ओळखीचं माणूस ४६
माझ्यांत बुडून स्वतःला विसरलीस तरीही ४७
नम्र ४८
क्षमस्व ४९

पैरण ५१
गुलाब ५२
उन्हाळा ५३
तुरा ५४
शस्त्रसज्ज ५५
आयुष्य ५६
वेडा ५७
एका क्षणीं ५८
एक वेळ ५९
चारचौघांत ५९
तेव्हा ६०
माथेफिरू ६०
ईश्वर : पांच कविता ६१
कवितेची ओळ ६४
रस्ते निर्मनुष्य झाले तेव्हा ६५
दावेदार ६६
सूर्याच्या पांच कविता ६७
दारूची एक कविता ८२
चळत ८८
उभं आयुष्यच जळतंय ८९
चौसोपी ८९
मी सांगतोंय ९०
आक्रोश ९१
सूर्यरोग ९३
अलीबागचा समुद्र ९४
उद्यासाठी ९५
गळालों ९६
सुखसण ९७
कविता ९८
जें दिसतं दिशांना ९९
हसलों १००
नव्हतों १०१
हृदयांतून १०१
वादळ १०२

---

स्थिरचित्र ७१
मीं म्हटलें ७२
संपूर्णपणे वेगळी ७३
चढउतार ७४
बी ७५
मी नसेन ७६
मृत्यूची एक कविता ७७
प्रार्थना ८०
परिसर ८०
गुडघ्यांत मान खुपसून ८१
पाऊस १०३
विनाशी १०४
तूं–मी १०५
पहाटे पहाटे १०६
ती १०७
वीज १०८
तूं १०९
जन्म १०९
उभार ११०
कृष्णकमळ १११

# अशीच यावी

अशीच यावी पावसाची सर
माहीत नसावें लाजाळूला तेव्हा
मिटून घ्याया आपुल्या पापण्या;
ओलेत्यानेच
निळीं-पांढुरकीं गोकर्णीचीं फुलें
ढाळीत बसावीं थेंबांचे अश्रू ;
भिजत माती मंद हसावी;
कोवळें ऊन
जावें भिजून!
वाऱ्याला पंख फुटावे तेव्हाच...
लालसर पाणी
झुंज वलयांची बसावें लावीत;
देऊन हूल
पाडावी भूल इंद्रधनूला;
अशीच लहर यावी पावसाला!

## आज फुलल्या मनाला

आज फुलल्या मनाला
कांही आगळाच गंध,
आज वाहत्या वाऱ्याची
कांही वेगळीच साद.

थरथरत्या ओठीं या
तरारतें थरके स्मित,
पापणीचीं मोरपिसें
फुलझुलती धुंदींत!

आज वारा खोडकर
आणि पदर ठरेना,
आज जमीन मखमल
नाचत्या या पावलांना.

—क्षण बावरल्यें, भ्याल्यें;
तुझें पाऊल दारांत!
लकाकलें कांही तरी
गंध-भरल्या उरांत!

नासिकेंत उष्ण श्वास
थबकला अवेळींच;
—पांगाऱ्याच्या फुलावर
कावळयाची लाल चोच!

# नाही म्हटलें तरीही

नाही म्हटलें तरीही
ऊन आरासलें आहे;
मन भोवळून पाहे.
नको म्हटलें तरीही
उगा कळीच्या उरांत
गंधकळ ठणकत.

नाही म्हटलें तरीही
आंबा पिकोनियां गळे;
कावळयाची चोच भुले.
नको म्हटलें तरीही
डोळे मिटते लाजरी,
थरथरते साजिरी.

नाही म्हटलें तरीही
केतकीच उसासली;
थोडी हवा गढूळली !
नको म्हटलें तरीही
बहरली सदाफुली,
थेंबाथेंबांत नाहली.
नको म्हटलें तरीही
केळ राहिली गर्भार...
कशी पोसवली केळ
नाही म्हटलें तरीही ?

## गाज

हातीं होतें तेंही गेलें,
भविष्याचें झालें भूत,
आता मिटल्या डोळयांत
रात्र एकाकी जागत.

हातीं होतें तेंही गेलें
स्वप्नें तोडून देठांत;
झाड वठलेलें उभा
आकांतच आळवीत.

आठवावें पुन्हा सारें,
देठ नवा रुजूं द्यावा;
कळी फुलण्याआधीच
पंख पानांचा घळावा !

काठ गेला नदीपाठी,
उगमही विझलेला;
दूर सागराची गाज
पिसें लावीत जिवाला.

## आलेख : कवितेचा

संथ जळाच्या
हिर्व्याशार काचेने
खोचलेले सुरूचे तुरे, पैलतीरींचे;
उडणाऱ्या टिटवीच्या
चढ-डुबीचा काळा रेखालेख, मध्यावरचा;
ह्या काठाशी
उसळणाऱ्या मासोळीने फेकलेल्या
गीत-तबकड्या—थरथरणाऱ्या.

—हा कवितेचा आलेख मनाला जाणवणारा
कधी ग, टिपून घेतला
तुझ्या नितळ डोळ्यांनी ?

## बगळा

खळ्खळूनी झाड जेव्हा आपुल्याशी हासतें
प्राण माझा पान त्याचें होउनी हिंदोळतो.
देह भिजुनी दर्वळे, जेव्हा असा वाऱ्यांतुनी
सर मृगाची शिंपुनी घन विर्घळे मातींतुनी.
माळ हिरवागार...मधुनी रंगलीं बुजरीं तृणें,
श्वास माझे चुंबिती त्यां, होत पिवळालीं उन्हें.
संथ लाटा सूर्य चुरुनी शिंपिती काठावरी,
एक बगळा हळुच त्यांतुन वेचिताहे मासळी.

# ती कांही बोलणार होती

गर्भवतीच्या डोळ्यांतील काजळरेखेसारखी
एक लकेर गीताची तमांत भिजून विरूं आली;
ऐलपैल एक झाले नदी बुडवून ह्या वेळीं

आकाश म्हणालें,
"तूं आणि तुझीं स्वप्नें कवेंत माझ्या मावत नाहीत
घर माझें इथे सोडून मीच येतें तुझ्या कुशींत."

वारा म्हणाला,
"हीं तुझीं स्वप्नचित्रें चितारलेलीं माझ्यावर
मीच मीच आलों जपत प्राणांपेक्षा आजवर :
पानेंफुलें...झरे...आकाश...पक्षी...डोंगर...
तुझी सृष्टी दृष्टीहून खोल खरोखर."

बोलण्याआधीच एक अश्रू हुंदक्यासारखा डोळ्यांत घोटाळला.
कूस बदलून बघितलें तों माती आपली हसत;
परिचित कुणी भेटावें खूप दिसांनी मी तसा फुललों मनांत.

ती कांही बोलणार होती...इतक्यांत
रडतें मूल हातांत घेऊन माझी बायको
तरातरा चालत आली माझ्या पुढ्यांत, आणि म्हणाली,
"घ्या ! माती खाईल तर लक्ष असूं द्या..."

## अंधाराची वाट

अंधाराच्या वाटेवर
श्रद्धा काचेची भंगली,
मनाचिया सोनियाला
कळा पितळेची आली.

अंधाराच्या वाटेवर
उभी वासना लाघट,
खोल तळाशी बुडालें
पुण्य पापाच्या डोहांत !

अंधाराच्या वाटेवर
गात्रें रक्तांनी बोलती,
थोडें पेटवून मांस
श्वाससर्प फूत्कारती.

अंधाराची वाट अशी;
आंधळाही पाहूं शके.
अशा एखाद्या वाटेला
द्यावें तोडून मुंडकें !

## फक्त

श्वास आता फुलत नाहीत,
फुलतां फुलतां कुस्करतात;
रात्र ओढाळ वहात नाही,
रक्तामधून जळतें मांस.

डोळे आता जाणते झालेत,
ओठांचीही चव जून;
बाहूपाशी खुपतात बोटें,
आसच फक्त नशेहून.

मात्र आतून पेटत असते
चांदण्यासारखी हुरहूर;
चंद्र नसतो आकाशांत,
ढगच नुसते दूरभूर...

## रंग कोणता रक्ताला

रक्ताहून लाल अशीं फुलें फुललीं नाहीच,
तिच्या मनाचा विखारी देठ स्फुरला नाहीच.
बंद बरणी पाऱ्याची : तिचा आळसला देह,
कधी वसंतउन्हाने नाही वाढविला दाह.
वारा पिस्कारून जातो मुक्त तिचे केश फक्त;
घन ओथंबून... खिन्न जाई परतून रिक्त.
नखांकेसांऐशा तिच्या बधिरल्या संवेदना,
तिने पुशिलें न मना—रंग कोणता रक्ताला.

## चेटुक

तळ गाठायला खोल बुडालों आणि केव्हा दमछाक झाली;
बाहूपासून हात अलग...श्वासवेल घळून गेली.
अंधाराच्या चेहऱ्यावरील रेषा रेषा पुसूं आल्या,
उस्कटलेल्या उनाड नाड्या सरळ निमूट वाहूं लागल्या.
जीव पिसाहून हलकाफुलका...गारवा जरा केसांत शिरून
हलके हलके झोप पांघरून डोह पुन्हा शांत झाला.
हात रुजले खांद्यापाशी, वेल लयींत झुलूं लागली,
झुलतां झुलतां सहज कशीं तिला फुलेंच फुलें आलीं !
काठापाशी बेसावध मी...कुणी कसें चेटुक केलें—
बघतां बघतां हात दोन्ही खांद्यापासून अलग झाले.

## अपेक्षा

प्राथमिक प्रामाणिक अपेक्षा एकमेकांविषयी
तिने माझ्या, मीं तिच्या, पुऱ्या केल्या
आणि समाधान पावलों.
पुन्हा अनेकविध अपेक्षा एकमेकांविषयी
आम्ही बोलून दाखवल्या एकमेकांना
त्याही पुऱ्या झाल्या सुखाने, सहजतेने.
अपेक्षाच नंतर कांही उरल्या नाहीत,
बोलून दाखवण्याइतक्या :
पण आम्ही तेंही सांगितलें एकमेकांना;
आणि उत्तररात्रीला
सुखाने रडलों एकमेकांजवळ.

# आता रात आकाशाची

भुक्या मनांत नभाच्या
एक चांदणी बोलली;
रित्या डोळयांत तळयाच्या
निळी सांज आकाशली.

दूर माळरानावर
पान वाऱ्याचें हाललें;
सोनावळीने पिवळे
कवडसे उधळले.

आता रात आकाशाची
फुले तळयाच्या डोळयांत;
झुले माळाचेंच पान
सोनावळीच्या तोऱ्यांत !

# माणूस

श्वास हलतो म्हणून माणूस हलतो.
जवळपास शब्द चार देऊं-घेऊं येतात.
प्रेम-माया, राग-लोभ, कुणी कुणापाशी
अधूनमधून, वेळींप्रसंगीं बोलूं-सांगूं शकतात.

द्वेष, हेवा, तसा कांही रक्तांतला नसतो :
पानें जशीं वाऱ्यावरती अधूनमधून किडतात;
मी म्हणेन, देठापाशी रुजतो नवीन कोंभ,
वाढावा तो, पोसावा तो, म्हणून पानें जगतात.

जळ इतकें निर्मळ असतें...आपलीच ओंजळ गढूळ;
पितां पितां सांडतें खाली फाटक्या हातांतून;
मी म्हणेन, हेंही खूप...खुशाल बस सावलींत
पैरणीला कायेच्याच ओले हात पुसून.

रात्रीं मात्र माणूस बदलतो...थोडी हवस असते,
पशू होते रग थोडी त्याच्या अंगांतील;
मी म्हणेन, पांगाऱ्याचीं हीं लाल फुलें
दवांत कोवळ्या भिजून उद्या मऊ होऊन येतील...

माणूस जगतो माणसासारखा...पाप करतो मुकाट;
आई-बाप, पोरेंबाळें खांद्यावरती घेतो;
उद्या कोणी खांदा देईल...नाही त्याला चिंता;
निघून रस्ता घरापासून स्मशानाशींच थांबतो.

## तूं जन्माचा वैरी माझा

तूं जन्माचा वैरी माझा;
सुखाचीच लालूच दाविली.
तुवां दिलेलें दान प्यायलों;
ओंजळींतुनी डोळे मिटुनी.

दाह विखारी देहीं भिनला,
पण माझा चेहरा नित हसरा.
ढगें जरी पोटांत दाटलीं,
नितळ जळाचा रंग न ढळला.

मानित आलों, काळोखाचा
तुझ्या कृपेने प्रकाश होतो,
पिकतीं शेतें, हलतीं झाडें...
घरोघरीं आनंद नादतो.

तूं छातीवर चीर पाडिली,
रक्त मीं तसें वाहूं दिधलें;
तुला प्रिय असें, तुझ्याचखातर,
दारीं मीं फुलझाड लाविलें.

नाहि न म्हटलें; घेत राहिलों;
घेतां घेतां कळलें आता :
तूं मरणाचा कैवारी, पण
तूं जन्माचा वैरी माझा.

## तें

जन्मल्यापासून त्यांनी दुःख-बीं जोपासलें;
जळ मिळोनी, खत मिळोनी झाडहीं फोफावलें.
लक्ष फांद्या, कोटि पानें, लगडलेलीं किति फळें;
ते म्हणाले, "चीज झालें...फिरकलीं ना पाखरें."

चाखलीं त्यांनी फळें हाडांतुनी रस रिचवुनी;
घर बुडालें...आसऱ्याला साउली होतीच ही!
अश्रु तरि ना उमटले; नुसतीच डोळां भावली;
हात दोन्ही जुळवुनी ती कांहिसें अन् बोलली.

लूतभरलें श्वान जैसें एकुटें रडतें कुठें,
रोज दिवसा आणि रात्रीं धुमसतें त्यांचें मढें.
विस्तवाला विझविण्याचें आगिलें ना कधि मनीं;
लाकडें त्यांनीच येथे टेविलेलीं जमवुनी.

भूक त्यांची जन्मली अन् बारशाला वारली.
पोट त्यांनी जगविलें दुःखास मागे लावुनी.
ऊर ऐसें तडकलें की, कापलीं पाळेंमुळें;
झाड त्यांनी जगविलें...जगलेहि ते झाडामुळे.

## ते जिंकले

जीवनाचा स्वाद त्यांनी घेतला अन् जिंकले;
लायकी नाही जिण्याची...आमुचें झालें हसें.
पाप त्यांनी दडविलें अन् पुण्य माथां मिरविलें;
आमुच्या नशिबांत नव्हतें...पुण्य झालें पापसें.

जाणिलें कैसें जगावें मत्त वृषभाच्या बळें;
शेत सारें फस्त...भय अन् तीक्ष्ण शिंगाचें वरी.
आमुच्या डोळयांत थोडा धुमसला अग्नी तरी
कुणि करावी फिकिर आम्ही उलटतों ना जोवरी !

वीष आम्ही पचविलें अन् अमृताने तृप्त ते;
बीज आम्ही पेरिलें...कोठार त्यांचें सांडतें.
किन्तु जेव्हा चार टिकल्या दाविती चांदीचिया,
भाबड्या चित्तांत अमुच्या प्रेम त्यांचें वाहतें.

मेळवीलें धन तयांनी, बांधिले वाडे नवे,
बाग त्यांनी फुलविले...सालांत उठले किति मळे,
लावियेलीं मार्गशीर्षीं आमुचीं लग्नें...पुसीं;
बायकांना काम दिधलें, आणि त्यांही जिंकलें !

## बसलेला

तिथे कोपऱ्याशी
एक कुणी
जिवाचा धूर करीत
बसलेला.

मानेपाशी...पोटापाशी
चुरगळून गेलेलें
खमीस त्वचेचें
सावरीत बसलेला...लक्तरलेला;

चतकोर भाकर
भुकेच्या क्षेत्रांत
इथे
तिथे
पेरीत बसलेला (मैला-
मैलाच्या अंतराने)
खचलेला...

तिथे कोपऱ्याशी
जीव चाळवीत
एक कुणी
बसलेला.

## जगणारे

जगणाऱ्यांचें करावयाला हवेंच कौतुक,
पण मृत्यूच्या औदार्याचे गात पवाडे.
राख घराची होण्याआधिच नेत्र मिटावे...
स्वप्न तयांचें असें नदीच्या कुशीस ठावें.

दिवसा-रात्रीं नाम मृत्युचें, तोच विसावा.
भरून घ्यावा आतड्यांतुनी कधिमधि वारा.
मात्र नसांतुन रक्त हवें...जर तेंच आटलें
तर गाडीच्या चाकाखाली मिळे निवारा!

पोटासाठी देउन कोणी बाइल न्यावी
(फक्त रात्रिला.) दिवसा आम्ही...पाप न कांही.
खुशाल पोरें रस्त्यावरती द्यावीं सोडुन;
डोळां सुरमा...पुन्हा हार अंबाड्यावरती!

देव कृपाळू...मधेच तोही सूख दावितो.
मरणाऱ्यांची जगण्यासाठी रीघ लागते.
पितां पितां पण जहर होतसे सूख दिखाऊ
अन् प्रेतांवर नजर लावुनी नभीं गिधाडें!

जगणाऱ्यांचें कसलें कौतुक—ते तर जगती
मरावयाचें उद्यां म्हणोनी; मरण : न चुकतें;
आणि आजचें सरण संपतें...नदितळ दिसतो.
पोट रिकामें म्हणुन पवाडे गात बैसतें.

# सत्य

स्वप्निंही ना याचिलें तें सत्यसृष्टींतून जगतें,
वांछिलें मीं;—भूत त्याचें स्वप्निं माझ्या नित्य फिरतें.

ते म्हणाले, "चंदनाला गंध असतो."
मी म्हणालों,
"सत्य आहे."

ते म्हणाले, "चैत्र येतां पालवी फुटते तरूला."
मी म्हणालों,
"सत्य आहे."

ते म्हणाले, "स्वप्न कधिही सत्य नसतें."
मी म्हणालों,
"होय.—नसतें. चांदण्याला गंध नसतो. सत्य आहे."

सत्य त्यांनी सांगतांना मान मीं डोलावली;
वांछिलीं मीं आणि स्वप्नें, दूर सत्यें पांगलीं.

## स्वच्छ तिच्या

स्वच्छ तिच्या वासनांना
वेळा-अवेळाचें भान :
रात्र नेसून दिवसा
नाही गढूळत प्राण.

आण तिची : काचेवर
खोल रेघा ओढूं नये;
भल्या दुपारीं देवाला
धूप-दीप दावूं नये !

तिच्या फुलण्याच्या वेळा
रातराणी-प्राजक्ताच्या;
उगवत्या किरणांनी
आत यावें खिडकीच्या.

बोंड-फुटत्या केळीला
नको वळीवाचा वारा;
तिच्या स्वच्छ देहा मग
माझा बाळस्पर्श हवा !

## संसार

रहाणेंच झालें इथे प्राप्त...आप्त,
सगेसोयरे सोयिने जोडणें;
काचेपरी वागणें स्वच्छ...जळही
त्यांच्यापरी अमृताने पिणें.

संसारिं सुख सर्व भांडयांसमान
घडवंचिला मांडुनी ठेवणें;
जरीची (किनारीच उडसून गेली)
घडी उस्कटूनी पुन्हा लावणें.

पुन्हा चालणें थेट नाकासमोर—
माथां जणू कुक्कुटाचा तुरा !
जरी लागलें पोट पाठीं भुकेने
तरी चेहरा ठेवणें हासरा.

जाऊं म्हणे—नाहि जाऊंच शकलों,
कुणी बांधिला पार हा भोवती ?
कुणाचे शिव्याशाप आले फळाला ?
कुणाच्या अशा बाधल्या संगती ?

# रंग त्यांच्या जीवना आलाच नाही

रंग त्यांच्या जीवना आलाच नाही,
सूख त्यांच्या बाजुला फिरलेंहि ना;
ते उन्हांतुन चालले रस्त्याप्रमाणे,
पाय त्यांचे कधि तृणा मिळलेच ना.

साउलीला थांबले ते आणि फांदी
मोडुनी त्यांच्याच ये डोक्यावरी.
मेघ आले नभ भरोनी, नाचले ते—
सूर्य तळपे ऊन जळतें ओपुनी.

सत्यनारायण तयांनी बांधतांना
धर्म केला, दीन जे त्यांच्याहुनी,
त्यां. भुकेने उरिं कधी दाटून चिंता
मूक बसले सर्व कांही सोसुनी.

चांगलें त्यांनी करावें, वाइटाचें
आडवें ये तोंच काळें मांजर,
अन् जिवाला घोर जेव्हा लागलेला
कोसळूनी ये घराचें छप्पर.

दैव त्यांचें देव झाला, पुण्य केलें
धर्म सांभाळून...एकच हा गुन्हा;
बेहिशेबी काम केलें भूक मिटण्या,
बेहिशेबी जगविलीं पोरें पुन्हा.

## वयपरत्वें

ईश्वराच्या अधिकाराची अंमलबजावणी
तुझ्या देहांतून होतांना,
सुखाहून दुःखच अनुभवलेंस
वयपरत्वें वाढतांना...

म्हणून तूं शिवीगाळ केलीस त्याला, देहभिंतींत
मनाचे वारे चिणून टाकलेस;
ईश्वराचें काम फक्त देह घडविणें...
दखल नाही त्याला कोणी गहाण घेतलें.

असो. पापपुण्याच्या हिशेबाची वही...
निदान तिच्यावरून एक नजर फिरव;
शक्तिहीन वारे मनाचे कुजूं लागले—
आता तरी खिडकी उघडून ठेव.

हद्दपार करून ईश्वराचें स्वामित्व,
या देहभिंती तूं झुगारून देशील
वयपरत्वें वाढलेलें एक गिधाड तेव्हा
त्याच्या अधिकाराची अंमलबजावणी करील.

# लिहावयाचें

खूप काहिसें लिहावयाचें नवें, प्रवाही
अग्नीपरि जें पावन अन् सत्यासम निर्मळ,
खळखळतें जें या हृदयांतुन मजला शापित.
जमतच नाही खडकामधलें फोडाया जळ...

नाहि फसविलें शब्दांनी मज, या कवितेला
परंतु त्यांचें वसन न पुरतें असें जाणुनी
दुभंगलों मी, पिसा जाहलों...ओसाडींतुन
वाट नवी धुंडीत हिंडलों मला निंदुनी.

मी दुर्भागी...सलणारें पण सलत राहिलें,
उरांतल्या मग अतृप्तीला मृगजळ दिसलें;
अशा धुमसत्या धगींत जळुनी मरण्यापूर्वी
ठिगळें जोडुन वसन सांधुं या, मनांत म्हटलें.

इतुकें केलें—पण हें अपयश अधीक दाहक
कळलें जेव्हा—खिन्न जाहलों आणिक अगतिक;
मलाच माझी करुणा आली...मी दुर्बळ तर!
खडकामधलें जळतच अजुनी या हृदयीं जळ.

# मनांत वारा वाजुन गेला

मनांत वारा वाजुन गेला :
मीं न हटकिलें त्याला;
जाळुन जाते प्रकाशकळ अशि
माझ्या अगतिकतेला.

दुःखें मीं सावरून धरिलीं
तीं उघडीं पडतील;
घेरतील मज शब्द इमानी,
देहीं जहर भिनेल.

मी मग माझा उरेन ? किंवा
पिसाटेन ढवळून ?
चढतां अंमल शब्द फोलकट
उडुन दूर जातील.

फुटतिल तेथे अगणित वाटा
धुक्यांतून रानांत;
शब्दांच्या पलिकडलें कांहीं
छळत मला राहील !

याच जाणिवेमुळे ठेविलें
बंद मनाचें दार;
कुठून वारा वाजुन गेला
लावुनिया हुरहूर.

## जगण्याइतुकें

जगण्याइतुकें नसेल कांही तुझियापाशी
तर तसाच ये घरांत येथे माझ्यापाशी.
नकोस आणूं कसलें किल्मिष मनांत, किंवा
नकोस टाकूं दृष्टिक्षेप हा दयार्द्र हळवा.

पाय सोडुनी ऐस, तुला खुर्चीची बैठक,
वाच हवें तर इथलें हें एखादें पुस्तक
मस्तकांतला दिवा लावुनी. पाहुं नको पण
किती वाजले...रात्र संपली की उरला दिन.

उन्हांत ये हिंडून जरासा, सांग समुद्रा,
नभास अथवा, सलणारें तें झाडुन सदरा.
धुळींत जेथे सूर्य विलसतो...ये तूं तिथुनी
पाण्यामधल्या चंद्रकोरिपर्यंत चालुनी.

जमेल इतकें तुला?...नाहितर उपाय सोपा :
घे खणून तूं सुबक लहाना जीवनवाफा,
कुंपण घे घालून तयाला; रुजेल तें तें
रुचिरपणे खाऊन जिवाला जगवायाचें.

कितीक जगले असेच माझे-तुझेहि पूर्वज!
म्हणूं नको रे, "जगूं नयेसें वाटतसे मज..."

# अकर्मावस्था

क्रियाहीन अस्तित्व
संपूर्ण फुललेल्या फुलाचें;
तरी उधळला जाणें केवळ सुगंध;
ही अकर्मावस्था...आमच्या फुलांना
नसतो सुगंध. आम्ही नेहमीच जागरूक असतों,
देठाचें शेपूट हातांत धरून;
तें मोडणार तर नाही ?
तें किडणार तर नाही ?
मृत्यूची चिखलधूळ आमच्या डोळ्यांना भिववीत असते;
एक जरी कण अंगावर सांडला
तरी आम्ही भयभीत होतों, पिसे होतों;
वाऱ्याच्या झुल्यावर आमची फक्त
(नकली) मान हलते;
शरीर आम्ही सांभाळून ठेवतों.
इथे गायचीं नाहीत गाणीं,
पाकळीपाकळीची रोज पाहणी...निगराणी.
कर्मावस्थेंतच संपते कित्येकांची जन्मकहाणी.
देहाचें अस्तित्व सांभाळून सदैव
आम्ही धडपडतों.
अकर्मावस्थेप्रत जाणारे असतीलही कांही,
त्यांचें जगणेंच आम्हांला समजत नाही !
जन्माचा देठ...मृत्यूची धूळ :
मधलें आयुष्यच एक अजब खूळ.

## आलेख : तिच्या स्वभावाचा

आलेख तिच्या स्वभावाचा : एक सरळ रेषा,
डावी-उजवीकडे मुळी न झुकलेली,
पाण्याच्या पातळीसारखी,
सारख्याच उंचीचे स्तंभ स्पर्शून चाललेली.
त्या सरळ रेषेच्या उंचीवर कांही क्षण
तिची-माझी भेट झाली;
तेव्हापासून पुढे अल्पावधीतच
तिचे स्तंभ थोडे जमिनींत रुतले, कांही मुळांत वाकले,
कांही अधिक उंचावर जाऊन थिरावले,
कांही मातीसपाट झाले.

मीं तिला विचारलें : हें असें कसें झालें ?
तिच्या डोळयांत पाणी आलें.
म्हणाली : तुझ्यासोबत चालतांना
आलेख तुझा स्वभावाचा काढीत गेलें.

## रस्ता

कधीतरी होणार होतें तें आजच झालें.
आजच नसतें झालें तरी कधीतरी होणार असतें.
कशावरून? कधी झालेंही नसतें.
पण झालें तें ठीक झालें...तर्क संपले.

दहा रस्त्यांच्या नाक्यावर आम्ही उभे असतों.
आम्ही उभे कुठेही असलों तरी तिथून
रस्ते फुटतात फुटायचे तितके...आम्ही विचारमूढ,
निमूट चालतों पायांखालील रस्ता बघून.

तो रस्ता संपत नाही; संपला तरी
तिथून असतो दुसरा रस्ता पुढे जात;
तोही संपला तरी आमच्या पायांमधून
दूरवरची सणक निघते रस्ता शोधत.

रस्ता संपला आणि चालणेंही संपलें असे कुणी
होऊन गेले, होणार असतील ते भाग्यवान.
चालण्याआधीच संपून गेले रस्त्यापाशी किंवा ज्यांना
रस्ताच नव्हता अखेरपर्यंत, तेही सुखी.

रस्ता सोडून आडवळणाने चाललों तर?
तरीसुद्धा आयुष्याची ग्वाही कांही?
चालणें आलेंच...निमूट चालूं रस्ता धरून.
झालें हें ठीक झालें; झालें नसतें असेंही नाही.

## ही वाळू

जन्माची कुंडली घरट्यासारखी मोडून पडल्यावर
वाळूंतून अक्षरें गिरवीत बोटांनी,
मान गुडघ्याखाली मोडून, या इथे
समुद्रकिनाऱ्यावर सचिंत;
उगवत्या सूर्याच्या मावळण्याचा अर्थ लावतांना,
नेमकें कांही आठवत नाही;
रेषा समजतात...बोटें दिसतात. ही वाळू
अशीच बोटांनी गिरवीत बसलों, हीं बोटें
अशीच वाळूंतून फिरवीत बसलों, किंवा
वाळू आणि बोटें यांच्याच चक्रव्यूहांत
गुरफटून गेलों तर
मावळणारा सूर्य
पुन्हा उगवला तरी कळणार नाही;
मावळणाऱ्या दिवसांच्या थडग्यांवर
असे कितीक सूर्य उगवतील!
वाळूवर पृथ्वीचें वर्तुळ काढून
पृथ्वीबाहेर रहाणें मस्त जमतें.
मग हा सूर्य, हा चंद्र,
शनि, बुध, नक्षत्रें...त्यापल्याड अगणित सूर्य,
पुढे पोकळी...कुठवर? पुढे काय?
डोळ्यांना दिसतें तें सत्य, पुढे भास.
मी हा पृथ्वीवरच, समुद्रकाठीं
वाळूंतून बोटें फिरवीत बसलेला.
ही वाळू अशीच
मावळणाऱ्या एके दिवशीं मला पुसून टाकील...

## चाळ

जळाआतल्या मातीला सूर्यकिरण अबोध दिसावेत;
श्वासांत श्वास मिसळले तरी लय पक्की जमत नाही.
माझ्या असहायतेची मलाच कीव येते...मी एकटा पडतों

स्वतःला विसरून जाणें आयुष्यांत अनुभवलेंच नाही;
तिच्यांत संपूर्ण विसरून जाईन, तेंही घडेना. (तरी
मन विसावत नाही तिच्याशिवाय, सारखी जवळ असावी वाटते.)

हा पाठीमागचा पडदा खेचून सूर्यकिरण कां कुजबुजतात?
तें जहरी स्वप्न चाळ बांधून दृष्टीपुढे फिरतें :
श्वासाश्वासांतून संपूर्णपणें शरीरभर पसरतें.

हात, पाय, डोळे इत्यादी हीं सर्व इंद्रियें माझ्या आज्ञा नेहमीच
शिरसावंद्य मानतात. मीही हुकूम गाजवतों. कधीकधी
मनांतच कुजबुजल्यासारखे चाळ वाजतात...मी एकटा पडतों.

मी एकटा पडतों; तिचीं लाख आर्जवें
माझ्या कानांपर्यंत पोचत नाहीत, उघडया डोळयांना दिसत नाहींत :
दूरवरून गाज ऐकूं येते...हृदयामध्ये कोलाहल;
जळाआतल्या मातीवर सूर्यकिरण उतरत नाहीत.

## अर्धी झोप

पुरांत मोडलेल्या पुलासारखी अर्धी झोप
मधें भुताचें ओरडणें, वाऱ्याची खळखळ.
झोपेंत असतों तरी जाणवतें झोप येत नाहीय—
दुःस्वप्नांचे गाळसाळ मनाच्या बांधावर.

लख्कन उजाडेल तर बरें, वाटतें,
किंवा मस्त झोप येईल उजाडेपर्यंत.
घशाला कोरड पडलीय... आणखी किती चालायचें ?
खूप खालें अगदी गळ्याशी येईपर्यंत—

त्याचा वास डोळे उघडल्यावरसुद्धा
नाकाला जाणवतो...पोटांत खोल खड्डा पडतो.
दूरवरून काळोख कोसळत येतो उरावर
अंग आखडून पुन्हा मी डोळे मिटतों.

दहा वाजतां भेटेन म्हणालीस, मग ?
मग इतक्या लवकर कशी ?
तशीच. तुमची वाट बघत...आता घ्या बघू
एक वेणी अबोलीची छानशी.

वास्तविक आताच कांही उजाडलें नाही;
उजाडेपर्यंत एखादी डुलकी येईल; येते
ती नको असते. पण मिटणारे डोळे
माझ्या स्वाधीन नसतात. रस्त्यामागून रस्ते

वहात जातात, सरकतात...त्यांच्यावर
खूप फुलांचा पाऊस पडतो.

# अर्धी झोप

पुरांत मोडलेल्या पुलासारखी अर्धी झोप
मधे भुताचें ओरडणें, वाऱ्याची खळखळ.
झोपेंत असतों तरी जाणवतें झोप येत नाहीय—
दुःस्वप्नांचे गाळसाळ मनाच्या बांधावर.

लख्कन उजाडेल तर बरें, वाटतें,
किंवा मस्त झोप येईल उजाडेपर्यंत.
घशाला कोरड पडलीय...आणखी किती चालायचें ?
खूप खालें अगदी गळ्याशी येईपर्यंत—

त्याचा वास डोळे उघडल्यावरसुद्धा
नाकाला जाणवतो...पोटांत खोल खड्डा पडतो.
दूरवरून काळोख कोसळत येतो उरावर
अंग आखडून पुन्हा मी डोळे मिटतों.

दहा वाजतां भेटेन म्हणालीस, मग ?
मग इतक्या लवकर कशी ?
तशीच. तुमची वाट बघत...आता घ्या बघू
एक वेणी अबोलीची छानशी.

वास्तविक आताच कांही उजाडलें नाही;
उजाडेपर्यंत एखादी डुलकी येईल; येते
ती नको असते. पण मिटणारे डोळे
माझ्या स्वाधीन नसतात. रस्त्यामागून रस्ते

वहात जातात, सरकतात...त्यांच्यावर
खूप फुलांचा पाऊस पडतो.

माझ्या घराच्या खिडकीमधून
किती सुगंध ढगासारखा फिरतो !

खमंग शिऱ्याचा वास : भूत सैपाक करतें.
मोडलेला अर्धा पूल पाण्यामधून हादरतो.
डोळ्यांवरील लाटा दूर करून उठतांक्षणीं
समोरच गॅलरींत कावळा ओरडतो.

## दुपार

तव्यांत भाकर,      डोळ्यांमध्ये धूर,
मळलेलें पोर      मांडीवर.

वाऱ्याने हालते      हवी तशी चूल,
केसांचें शेवाळ      पिस्कारतें.

माथ्यावरतून      गुलमोहोर झडे,
भूक गडबडे      लाल पोटीं.

दुपारीला आता      झळांचाच पूर,
घामेजतो ऊर      चोळींतून.

शिजलेत डोळे,      भिजली कंबर;
तव्यांत भाकर      धुर्कटली.

# सुखदुःख

दुःखांतच सुखाला स्मरणारीं हीं माणसें :
सुखांत असतांनाही दुःखाची भीती बाळगतात.
सुख सामोरें जवळ...दुःख दूर, पाठमोरें,
तरीसुद्धा यांचे डोळे मागे फिरतात.

काळ्याशार रस्त्याच्या फांदीवर
हीं यांचीं पानें फडफडणारीं,
चौकोनी डब्यांत शिरतात किंचाळत
झाडावरून सर उतरतांच पावसाची.

सिग्रेट संपावी आणि बस यावी, तशी
भोजनोत्तर छानशी डुलकी येते.
इतकें सुख अघळपघळ विडयासारखें
चघळत बसतात दातांमधून जिभेकडे.

दातांमधून जीभ फिरवतां फिरवतांना
जीभ दातांतच अडकली तर?
रात्रवेळीं बायकोजवळ असतांना
मर्तिकाचा ढोल वाजतो दूरवर.

दुःखांतच सुखाला स्मरणारीं हीं माणसें
यांचें सुख ओंडक्यासारखें तोडलेलें;
उद्या त्यालाही पालवी फुटेल, पण नाही!
त्यांच्या चुलीला कशीं जळतील ओलीं लाकडें?

## संपूर्ण आयुष्याचा अर्थ

मी आज सुखी आहें
माझ्या हातांत एक संपूर्ण भाकरी आहे,
पण मी ती खाणार नाहीं अनेक कारणांमुळे;
त्या भाकरीच्या चतकोरासाठी
पोटाने उचललेला हात कुणी वर करील,
तर त्या हातावर मी निखारे ठेवीन!
मी कुणाला कांहीसुद्धा देणार नाही;
कुणाजवळ कांहीसुद्धा मागणार नाही.

हीं अतिक्षुद्र, क्षुद्रातिक्षुद्र माणसें
चतकोर भाकरी खातात.
घटाघटा पाणी पितात.
बायकांना लाथा घालून त्यांच्याशी
बलात्कारी प्रेम करतात.
पोरें वाऱ्यावर सोडून देऊन
चार जणांच्या खांद्यावरून निघून जातात.

माझें दुखणें निराळें आहे :
जगण्यामरण्याच्या अरुंद साकवावर मी उभा आहें.
मी पुढे जाऊं शकतों, पण नाही.
मागे वळावें का, पण नाही.
कारण मी माझें आयुष्य
कोणत्याही कारणाशिवाय धुळीला मिळवूं शकतों,
किंवा क्षुल्लक कारणासाठींहि तें जगवूं शकतों.

क्षुद्रातिक्षुद्र माणसांच्या या जगांत
मी जन्माला आलों.
जगावें कसें?—हा माझा प्रश्न नाही.

मरावें काय?—हाही माझा प्रश्न नाही.
मला संपूर्ण आयुष्याचा अर्थ हवा आहे.
मी जगतों कां?
तूं जन्मलास कां?
जगणें अपरिहार्य आहे काय?

—दुसऱ्या बाजूने माझ्याकडे येणाऱ्याला मुद्दाम थांबवून
म्हणूनच मीं
संपूर्ण आयुष्याचा अर्थ विचारला.
तो थांबला. त्याची नजर भिरभिरली.
पुन्हा फडफडत पोटाने उचललेली ती नजर
माझ्या हातांतील भाकरीला ग्रासून राहिली.

## सोहाळे

डोळे मिटतांक्षणींच
चंद्र रक्तांत भिजले,
सारे देहाचे सोहाळे पुरे झाले.

झांजा, टाळ खळाळले,
नाद वाऱ्यास मिळाले,
धुक्यासारखे दाटले श्वास जेव्हा.

डोळे मिटून पाहिले
असे सोहाळे सुखाचे;
आणि भिजल्या फुलाचें अंग तिचें.

## कांही बोललों असेन

कांही बोललों असेन चुकूनमाकून
मुद्दाम वर्मावर बोट ठेवून;
फक्त स्वल्पसें असेन बोललों प्रेमाने
हृदयापासूनचें, तेंही चुकूनमाकून.
मला कांहीतरी झालें आहे : मी माणसांत नाही.
नुस्तें एकाकी राहावें वाटतें बापुडवाणें.
खरेंखुरें सांगण्यासाठी कितीदा मीं तोंड उघडलें;
बोललों तें खोटें नव्हतें, पण अस्सल नसलेलेंसें.
आता फडफड पुरे झाली...तूं स्वस्थ पडून राहा.
मीच मला शोधत असतांना तूंच मला माझ्यांत शोधतेस!
कर्मदरिद्री माझ्यापाशी देण्यासारखें कांही नाही.
मी पुन्हा परत येईन तोवर तरी स्वस्थ ऐस.
अस्वस्थ मनाने तुझ्याशी मीं हुज्जत घातली, कशासाठी?
माझ्या स्वप्नांतल्यासारखी तूं मला दिसावीस म्हणून!
माझें समाधान झालें नाही—खरेंच नाही,
म्हणूनच बोललों मुद्दाम वर्मावर बोट ठेवून,
तेंच बोट हातात धरून तूं इतकी स्वच्छ हसलीस!
पुन्हा निघालीस माझ्या शोधांत रस्ता धरून.
मी मला शोधणार नाही, फक्त सांग—
कोणत्या रस्त्याने निघाली आहेस...अशी चुकून?

## व्यापताप

घडामोडी, मोडतोड, दळणवळण, उत्पात
माझ्या अफाट गुंतागुंतीच्या क्लिष्ट मनांत;
त्यांचे उगम, त्यांचें प्रयोजन
अनाकलनीय, अतर्क्य.

संमिश्र हे व्यापताप मनांतले शांत झाल्यावर
मी पहातों;
माझ्या धडधडत्या काळजाआत थेट
तुझें रोखलेलें बोट रोखठोक घुसलेलें असतें. भयावह,
सर्पगार विळ्खे अंगांगांतून वळ्वळ्तात.
महत्प्रयासाने सगळे भोंगे दिशादिशांतले
मी वाजवतों, सुरुंग लावतों कड्याकपारींतून.
कल्लोळ, कोलाहल, धूर, धुकें, धूळ...
शरीरभर—बाहेर
गुंतागुंतीचें दळणवळण सुरू करतों.
आता तुझें रोखलेलें बोट
मी छाटूं शकतों.

# प्रतिमा

स्वतःचीच प्रतिमा भिंतीवर लावून
त्याकडे कुतूहलाने बघतांना,
मी माझी करमणूक केली.

मी इतरांना दिसतों कसा, त्यापेक्षाही
मी स्वतःला दिसेन कसा, हा प्रश्न
अधिक महत्त्वाचा. महत्त्व माझ्या प्रतिमेचें.

प्रतिमा बदलेल,
मी मात्र असाच राहीन.
बदललेल्या प्रतिमेला
त्याच कुतूहलाने न्याहाळीन.

स्वतःचीच प्रतिमा भिंतीवर लावून
एकांतवेळीं डोळे भरून येऊन
मी तिला छातीशी घेईन :
एक अश्रु तिच्याही डोळ्यात.

## शब्दांच्या वाळूने

अख्खी रात्र जागून काढली कवितेच्या धुंदींत.
होत्या-नव्हत्या सिग्रेटी फुंकल्या. पुन्हा विझलेलीं थोटकें.
सताड डोळ्यांत अंधार रिचवला.
मध्येच उठून घटाघटा पाणी प्यालों.
घशाला कोरड तरीही तशीच;
फक्त बेचैनी वाढली.

उठून सकाळीं ऑफिसला निघालो.
लिफ्टमधला उजवा की डावा एक पाय ठेवलेला
बाहेर काढला. समुद्रावर बसलों समुद्राचीं
शार्दूलविक्रीडितें ऐकत.

शब्दांच्या वाळूने
कवितेचें घर बांधतां येत नाही;
आणि उरांतला समुद्र
रस्त्यावर सांडतां येत नाही.

## श्रद्धा

माणूस फाटतो
कपड्याने, शरीराने, मनाने.
फाटलेला माणूस सावरतोही
प्रयत्नाने, काही चमत्काराने. परंतु
दुःखाची शुद्ध नाही,
सुखाचा बोधही नाही
असा
काळजाच्या तळापासून फाटलेला माणूस
आयुष्यांत कधी सावरत नाही, कसल्याही चमत्काराने.
त्याला इच्छा असते आणि नसतेही.
विचार, विकार आणि बुद्धी यांना उल्लंघून पार
हा माणूस
अधिकाधिक पिचत राहतो.
तरीही तो जगतो. असहायसा.
त्याच्या खोल गेलेल्या डोळ्यांनी
देहाची विटंबना जपत तो जगतो.
जगण्यावर त्याची श्रद्धा असते.

## हिशेबी

मोजकेंच तेवढें दिलेंस,
फिरविलेंस व्यापातापांतुन,
संकटांतही,
तरीहि आजमितीला
शिल्लक आयुष्यांत राहिलों
अब्रू राखुन. (तुझ्या कृपेने.)

तुझ्या हिशेबी देण्याविषयी
माझी ना कसली तक्रार.
देणारे तव हात थांबले
अर्ध्यांतच पण. (हीहि कृपा तव.)

तुझा भरवसा किती धरावा
तें होतें पूर्वीच जोखलें.
आयुष्याच्या शिलकीसाठी
ठेवूं शकलों
म्हणुन कांहि राखून हातचें
(तुझी कृपा रे!)

तुझा हिशेबी कारभार अन्
माझेंही व्यापारी जगणें.

## चिमणी

आभाळासारखें
धुकें विर्घळून खाली आलें;
झाडा-तळयांत जमून राहिलें...
खिडकीपाशी उभी राहून तिने
हात छातीशी लपेटून घेतले, आणि तशीच
एक चिमणी वरव्यामधून
उडून पानांत जाऊन बसली.

दारापाशी किरणें किलबिललीं,
तसा तो जागा झाला : "उजाडलें वाटतें."
"हो, कधीच!" ती म्हणाली.
देठ होऊन झुलत्या चोचीचा
चिमणी मग पानामधलें पान झाली...

## साद

जगावेंसें वाटत नाही तेव्हा प्रथम
आयुष्याचा विचार करतों.
जगतों कां? कुणासाठी?
उत्तर शोधतों. तेव्हा

खोल हृदयामधून
संथ नाद वाहत राहतो अंग भरून.
प्राणाआड दडलेलें एक पाखरू
साद देतें.

## रे !

स्वतःचंच गाठोडं बांधून अंधाऱ्या कोपऱ्यांत
तूं पडून राहिलास
तेंव्हा कुणी दिवाही लावला नाही,
साधी विचारपूस केली नाही,
तुझ्या पायापाशील ओली माती
कुणी सारवली नाही,
अंगावरील कोळिष्टकं
कुणी झाडलीं नाहीत.
तूं तिथं, तसा बसायला नको होतास.

तूं तिथं बसला होतास असं लोक म्हणाले.
तूं म्हणतोस की तूं तिथं नव्हतासच.
मग तें गाठोडं कुणाचं ?
वेदनेच्या, असहायतेच्या लोंबणाऱ्या चिंध्या कुणाच्या ?

तूं तिथं नव्हतास,
मग होतास तरी कुठं ?
की तूं या जगांतच नव्हतास ?
कशाला—कोणत्या अशा ओढीनं पीडित होऊन
तूं घर गुंडाळून बसलास ?
मुकाट, मूक झालास ?

...स्वतःचं गाठोडं उलगडून दाखवतांना
आता दिवसाउजेडी
तुझी राख होईल रे !

# दिशा

आयुष्याची दिशा चुकली.
पूर्व समजून डोळे मिटून उभा राहिलों,
तेव्हा पाठीमागे प्रकाश झाला. तत्पूर्वी
सगळ्या दिशा माझ्या ठरून गेल्या होत्या.
आता पाठीमागे वळून पाहण्यापेक्षा, म्हटलें
अशीच सुरुवात आयुष्याची झाली तर असूं दे.
(वास्तविक, इतकी गरज त्या वेळीं नव्हती वाटली,
पाठ फिरवण्याची.)
एक तरी वाट सरळ जाईल वाटलें;
पण सगळ्या फसल्या. मनासारखें आयुष्यांत
कांही घडलें नाही. पुन्हा हिंमत धरली.
निघालों. एकच एक वाट धरून निघालों. ती वाट
पुढे नदीने गिळली. मग उमगलें,
आपलें सगळेंच चुकलें.

फिरून जाग्यावर आलों.
डोळे मिटून उभा राहिलों.
प्रकाशाची चाहूल लागली तेव्हा
तोंड फिरवून पाहिलें आणि आकस्मिक
पाठीमागे प्रकाश झाला. पुन्हा म्हटलें,
नशिबांत नाही हेंच खरें!

आयुष्याची दिशाच चुकली म्हणून मग
समोरील दिशा पूर्व समजून हट्टाने
पायांखालील वाट न पाहतां निघालों.
आणि एके दिवशी

दिशांचा मुलाहिजा न ठेवतां म्हटलें,
आयुष्याला दिशाच नकोत...

## व्यथा

घर अंगणांत आलें,
पुढे फाटक उघडें;
आणि प्राजक्त-फांदीला
पान सागाचें लागलें !

तिथे उडालें छप्पर,
वर आकाश उजळे,
उन्हाचेच डोळे झाले,
मन गिर्कावून गेलें.

घर राहिलें न माझें,
दूर तळपे निळाई :
माझी डोंगराची व्यथा
धुकें पिंजीत राहिली.

# गृहस्थधर्म

रडण्यावेळे हसूं न आलें,
हसण्यावेळे तरी हसावें;
तेंहि न जमलें...उपाय ऐसा :
घरांतून बाहेर पडावें.

समुद्रकाठीं फिरून यावें,
अंगाभवती गिरकी घ्यावी,
मनांतल्या अडगळिच्या जागीं
फुलें बकुळिचीं पेरुन द्यावीं.

तेंहि न जमलें? व्यर्थ कशाला
गृहस्थधर्माविषयिं सांगणें ?
संसारातिल मर्म असें की,
रडण्यावेळे हसूं आणणें.

## ओळखीचं माणूस

ओळखीचं माणूस अनोळख्यासारखं
धक्का मारून पुढं जावं, तशी कविता.
मी तिची विनवणी करणार नाहीं,
क्षमा-याचना नाहीच नाही,
माझ्याशी उद्धट वागणाऱ्याला
मी जवळपास फिरकूंही देत नाहीं...

आता संध्याकाळ होईल, काळीकभिन्न रात्र
अंग ओरबाडून पुढे जाईल;
येणाऱ्या दिवसांत मी बळी जाईन.

अनोळखी झालेलं ओळखीचं माणूस पुन्हा
जुन्याच ओळखीनं सामोरं येईल—
(सावध रहा.) हसेल! गळयाला तांत लावून
चाफ्याच्या झाडावर एक पक्षी
विकल स्वरांत रडत बसेल...

# माझ्यांत बुडून स्वतःला विसरलीस तरीही

माझ्यांत बुडून स्वतःला विसरलीस तरीही
मी तुझा असणार नाही अशी सूचना तुला
मी देत आहें; आजवरच्या संबंधाने.

माझ्या असंतुष्टाला तुझा संतुष्ट
निरोगी काठ मिळाला,
तर सवडीप्रमाणे हवाही आहे;
तत्पूर्वी अशी सूचना, नात्याची.

शर्टाच्या बटणांशी चाळा नको...

मी झाडावर चढेन, त्या वेळींदिखील तूं त्याला
झारीने पाणी घालशील. तूं सुज्ञ आहेस.
मला तुझ्या खूप जवळ समजतेस
आणि स्वतःचाच समजतेस, हें चूक आहे.
माणूस स्खलनशील प्राणी आहे, तूंही तशीच.

मला ओळखण्यांतही तुझी अशीच चूक आहे.
सगळेच फसले तशी तूंही फसलीस.
हसूं नकोस अशी तुडुंब विश्वासाने,
माझ्या आधाराशिवाय.
उरांत सूर्य जळेल तेव्हा मी माझा नसेनच.
तूं तर असशील हजार योजनें दूर माझ्याहून,
जरी असशील जवळ;
आणि तुझ्या हिशेबीं अधिक जवळ सरकशील,
हवें-नको विचारशील...नक्कीच.

हें बघ, तूं सुज्ञ आहेस.
मी झाडावर असेन त्या वेळीं
फक्त
घरांत बसून तांदुळाच्या भाकरी भाज. निखाऱ्यावर
बोंबील करपूं दे, आणि
स्वस्थ चित्ताने
झाड कोसळण्याची वाट बघ.

## नम्र

नम्र. नमस्कारासाठीच वाकलेली जणू
उदबत्तीच्या धुरासारखी सुगंधी भाषा
आताशा
तिच्या बोलण्याचालण्यांत, वागण्यासवरण्यांत,
सैपाकांत, मोगऱ्याच्या गजऱ्यांत,
माझी वाट पहाण्यांत,
दिवसाच्या अनेक घटकांत.
ती नम्र माझ्याआंत, विनम्र माझ्यासमोर, जवळ, दूर.
माझ्या अश्वशक्ती रक्ताच्या विश्वासांत,
अंधारप्रवाहाच्या भोवऱ्यांत.
पुन्हा नम्र इकडून, तिकडून, पलीकडून.
माझ्या सामोऱ्या, पाठमोऱ्या, चौफेर शक्तींतून; शक्तीमुळे
नम्र. आताशा
अधिकच नम्र, माझ्या
पौरुषाला वागवतांना
उदबत्तीच्या धुरासारख्या धुंदींत.

## क्षमस्व

हें घे.
मीं घेतलें.
अमुक करूं नकोस.
मीं नाही केलें.
तमक्याच्या वाटेला जाऊं नकोस.
मीं वाट बदलली;
मी अत्यंत सभ्य माणूस झालों. विनयाने
मी तुम्हांला प्रणाम करतों.
तुम्ही माझ्यापेक्षा मोठे आहांत.

सूर्य उगवतो ती दिशा पूर्व असते.
तुम्ही तिला पश्चिम, उत्तर किंवा दक्षिण कांहीही म्हणालांत
तरीही ती पूर्व असते.
सत्याला बदलतां येत नाही रंगांत मिसळून.
दिशा कळण्याइतकें ज्ञान मला आहे,
म्हणून आता
उगवत्या सूर्याला मी प्रणाम करतों.
तुमच्याकडे माझी पाठ झाली असेल
तर क्षमा करा. माझी वाट अटळ आहे.

तुम्ही देणार असलेलें मला हवें असेल,
तर अवश्य घेईन, आभारपूर्वक;
पण पश्चिमेला पूर्व म्हणायला मला सांगूं नका.
मला माझ्या वाटेने जाऊं द्या.
समजा,
मी तुमचा कोणी सगासोयरा म्हणून
जन्मलोंच नाही.

तुम्ही मोठे आहांत. मोठ्या मनाने
मला क्षमा करा.

मी ऋणी आहें तुमचा.
मी ऋणी आहें तुमच्या
माझ्यावरील प्रेमाचा.
तुम्ही हुशार आहांत. ही वहिवाट
तुमचीच आहे. तुम्ही तिला
कुंपणही घातलें की! हेंही छान झालें.
मीही तुमच्यांतच; पण माझी वाट
पलीकडून जाते. मी तरीही
तुमच्या वहिवाटींतून तुमच्या बरोबर असेन.
आता तरी?
तुम्ही जवळ येऊं नका... मला भीती वाटतेय.
मी ऋणी आहें तुमचा. आजन्म.
आणखी एक :
इतके शब्द उधळूं नका भुलावणीचे.
तुम्ही मोठे आहांत. तुमच्यासमोर
मी नम्र आहें.
कांही चुकलों असेन, तर
मोठ्या मनाने मला क्षमा करा.

## पैरण

उजाडणारा प्रत्येक दिवस पैरणीसारखा
मी खुंटीवर टांगून ठेवतों;
तेव्हा एक पाल त्यावरून सरपटत असते.
ढेकूण, मच्छर यांचा तर नेहमीचा फाल्गुनमास.
म्हणून दिवसाकडे दुर्लक्ष करून
डोळ्यांपुढील कावळे हाकलवीत
बसणें बरें असतें.

समुद्र मी जन्मल्याआधीपासून असावा गर्जत.
आरामखुर्ची आणलीय घरांत;
सिग्रेटी बापड्या धूर सोडायला.
बायको ? आहे.
तीही माझ्यासारखीच पिकायला आलीय.
म्हणून मी आरामखुर्चीत सिग्रेटी फुंकीत
समुद्राकडे बघत मिटलेल्या डोळ्यांनी
(मिटलेले डोळे लवकर उघडत नाहीत आताशा.)
बसतों—उघड्या अंगाने.

अखेरीस मी डोळे उघडतों, तर
पैरणीवरील पाल झटकून
बायकोने ती कुंपणावर वाळत घातलेली असते,
स्वच्छ धुऊन,
उलटी करून !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३०६७१७५
ग्र. क्र.
२०६४७

## गुलाब

वाऱ्यांतून फुलताहेत गुलाब,
आणि गुलाब दरवळताहेत मनांतून आत;
आता वाऱ्याचे आवर्त भिंगऱ्या घेताहेत मनांत,
पुन्हा गुलाब फुलताहेत फुलताहेत भरांत...

समुद्राला उधाण येताहे,
पुन्हा पाऊस दूरवरून जवळ येतोय किनाऱ्यावर;
दाराआतले माझे पाय
वाळूंत असल्यासारखे थरथरताहेत भिजून,

मस्तकांतून दरवळणाऱ्या गुलाबांतून
माझ्या डोळ्यांसमोर दिसतोय
धुक्यासारखा समुद्र आणि पाऊस.
पाऊस पाऊस पाऊस कोसळतोय आकाश भरुन.

पायांचा आक्रोश समुद्राच्या गाजेहून.

## उन्हाळा

दिसताहेत चारी बाजूंनी झाडेंच फक्त हात उगारलेलीं.
आकाश कोसळणाराहेसें वाटतें डोक्यावर.
रस्त्यावरलें कुत्रें फाटक्या कुल्ल्याला बघून भुंकतेंय.
भोवतालचा उन्हाळा संपतां संपतां संपणारच नसेल;
नसेलही.

आकाशांतून खूपच गिधाडें आता घिरट्या घालताहेत.
झाडांच्या फांद्याफांद्यांवर
भुकेजलेले कावळे फडफडताहेत.
कुत्रासुद्धा माझ्या पायाचें किंवा
फासळीचें एखादें हाडूक चघळत असेल,
असेलही. असूं दे.

मी या सर्वांचा आहें. सर्वांसाठी.
आत्ता कुठे जें पिशाच्च माझ्या कानांशी कांही बोललें
तें माझेंही असेल, माझेंच असेल—

हा उन्हाळा संपतां संपतां संपणारच नसेल.

# तुरा

तिन्हीत्रिकाळ पोट भरलेलें असायचें;
तेव्हा माझ्या डोक्यावर एक तुरा होता.
सदैव हात पोटावर फिरवीत
मी एखादी उन्मत्त आरोळी ठोकत असें !
झाडांचीं पानें मजेशीर किलकिलाट करीत,
आकाशभर लखलखीत उन्हें फिरत, मिरवत.

तो तुरा आज या जगाच्या
जगण्याच्या धकाधकींत
मी हरवून बसलों.
भाडोत्री घराच्या कट्ट्यावर बसून
मी अभावितपणे एखादा ढगाचा कोर
कोरभर आकाशांत दिसतोय का,
तें पहातों. घरांत शिरून मग
डोळे गच्च मिटून घेऊन
एकेक घास घशाखाली ढकलतों.

माझ्या डोळ्यांसमोर पुन्हा पुन्हा
झाडांच्या दाटींतून
मोरपिसासारखा तो तुरा रंगीबेरंगी
झगमगत रहातो.

## शस्त्रसज्ज

शस्त्रांना नमस्कार करा.
त्यांच्यापुढे आणि पर्यायाने धारकांपुढे
दीनवाणे व्हा; प्रसंगीं केविलवाणे, लाचार व्हा.
जिवाहून प्यार दुसरें कांही नसतेंच प्रत्येकाला.

मराल, तर तुमच्या इच्छा, आकांक्षा, ध्येयें,
स्वप्नें, हव्यास यांचें काय होईल ?
मातीमोल.
मातीला मोल आहेच. तुमचा देह तर अमोल.

ईश्वराने नमस्कार करण्यासाठीच तर
देह वाकवतां येईल मानेंतून,
कंबरेंतून, गुडघ्यांतून अशी व्यवस्था
केली आहे.
व्हा, नतमस्तक व्हा. ईश्वरापुढे
आणि शस्त्रापुढे.

शस्त्राची पूजा बांधा.
करंगळीचें रक्त कपाळीं लावा आणि उठा.
शस्त्रसज्ज व्हा.
जमल्यास कत्तलखान्यास एकदा भेट द्या.
करवतीने झाडांचीं हाडें सर्सरा कापण्याचा
कारखाना बघा.
दोन पायांतून आणि शेपटीच्या हाडांतून
मेंदूपर्यंत पोलादाच्या कांबींचें
वेल्डिंग करा.

मान, कंबर, गुडघे ताठ ठेवून
शस्त्रसज्ज व्हा.
ईश्वरावर अचूक नेम धरून मग
पहिला भाला आकाशांत घुसवा.

## आयुष्य

मावळणारा सूर्य
आयुष्यांतील एक दिवस एका बाजूने
भाकरीसारखा खाऊन जातो—
हेंही आजवर लक्षांत आलें नाही
रोजची भाकरी खातांना.

मनांतले दिवे विझवून मी गाढ झोपीं गेलों.
अर्ध्या रात्रीला
वरवंट्याखाली कचाकच काचा फुटल्या;
आणि मनाला अस्वस्थतेचीं भगें पडलीं.
देहदुःख असतें, तर ओरडलों तरी असतों,
असहाय कळवळलों.

उगवणाऱ्या सूर्याला मीं प्रणाम केला.
म्हटलें,
मावळणाऱ्या किरणांसवें
माझी अस्वस्थता घेऊन जा;
आणि प्रगाढ निद्रेंतून मला
उद्यासाठी पुन्हा उठवूं नकोस.

## वेडा

मी वेडा होईन अशी भीती वाटते.
किंवा मी वेडा तर नाही?
परिस्थिती कसली आलीय?
ही मधली स्थिती धड ना आकाशाची,
ना इथली किंवा कुठलीही.
जमतच नाही जुळवणें नातें कोणाशीही—
कुत्र्यामांजराशी, वनस्पतीशी, मातीशी.
आकाशाची तर सदैव वाटणारी भीती.
जन्मलोंच कां? जगलों तरी कां आजवर?
आणि आता विचार तरी कसला करतों आहें
सगळाच फोलपणा कळल्यावर?
पायांखाली पसरलेल्या भयंकर रस्त्यांवरून
पुन्हा परत येतों या ठिकाणीं कशासाठी? की
हे रस्तेच मुळी सोकावलेल्या पायांतून निघाले आहेत,
त्यांनाच चकवण्यासाठी?
नुस्तें जगायचें आणि मरायचें;
तर ही ससेहोलपट आयुष्याची कशासाठी?
आता अर्थबिर्थ तरी कसला शोधतों आहें,
नाहीच जेथे पहिल्यापास्नं कशालाही?
संतुष्ट आणि आत्मतुष्ट कसें व्हायचें?
अध्यात्माची कसली कास धरायची?
नितांत शांतता लाभेल? शांतताच
खुनी माथेफिरूसारखी भटकतेय शरीरांतून
आणि रस्त्यांतून.

## एका क्षणीं

गरारणाऱ्या भोवऱ्यासारख्या
बेसावध एका क्षणीं,
विलक्षण तिरमिरींत,
विस्मरून मनुष्यत्व
बाहेर आलों उघडयावर;
समर्थ हात उभारून
भयानक आरोळी ठोकली,
रोखठोक जागच्या जागीं शांतता थबकली.
आकाशाला म्हटलें, "ये,
माझ्या बाहूंत ये,
ये."

आकस्मिकच माझे डोळे मिटले गेले,
वारे भरारून सुटले,
आसमंत हललेंसें वाटलें,
चांदण्यांचे थवे लखलखून कोसळले.

डोळे उघडले सावधपणे
तेव्हा माझ्या हातांत होता
आकाशाच्या पापुद्र्याचा तळव्याएवढा कोर;
दुसऱ्या हातांत वितीएवढा
वाऱ्याचा दोर.

## एक वेळ

बऱ्या-वाईट अनेक वेळा येतात,
सोयीसवडीने निघून जातात;
एक वेळ आयुष्यांतून हलत नाही,
तिला सोय चालत नाही.

इतर वेळा निभावतांना
तिची छळणूक चालूच असते;
तिच्यासाठी तिच्यामुळे मग
संपूर्ण आयुष्यच एक सोय होते...

## चारचौघांत

सर्वार्थाने आयुष्याचा विचार केला,
हिशेबी सभ्य राहिलों.
अघळपघळ बोललों नाही मर्यादा उल्लंघून,
चारचौघांत आस्थेवाईक वावरलों.

आयुष्यच परमेश्वराची इच्छा समजून
दुःखें दडपून मनांतून शांत राहिलों.
देहापासून अलग होऊन स्वत्व शोधलें,
कर्मरत झालों.

नाइलाज उरस्फोट झाला,
तेव्हा रात्रीच्या काळोखांत एकटाच रडलों.
डोळे पुशीत परमेश्वराला काळजीपूर्वक शिवी दिली
मनांत.

## तेव्हा

माझे पाय पाण्यांत असतात,
तेव्हा ती किनाऱ्यावर बसून
कुतूहलाने बघत असते.
मी गळाभर पाण्यांत
मलाही नकळत शिरतों,
तेव्हा ती डोक्यावर हात घेऊन
उभी रहाते, मावळत्या
सूर्याकडे बघून विचलित होते.
माझ्या डोक्यावरून लाट जाणार असते,
तेव्हा तिला घरीं जायची घाई होते.

## माथेफिरू

माझ्यांतला मी आणि एक तिऱ्हाईत.
बोलाफुलाची गाठ. आम्ही समोरासमोर आलों.
सगळा दडपलेला राग माझा उफाळून आला.
मी चिडलों, जळफळलों,
त्याला दूषणें दिलीं;
कसा छळ आयुष्याचा करून घेतलास, म्हणालों.
समजावणीच्या गोष्टीही सांगितल्या.

शांतपणे त्याने सारें ऐकून घेतलें.
एकदम माथेफिरूसारखा मग
पायांतली वहाण घेऊन
त्याने माझ्यावर हात उगारला.

## ईश्वर : पाच कविता

१.

कुणीही नाही
रखरखत्या सूर्यदंशी प्रदेशांत.
सावलीचें एकही माणूस नाही
ज्याच्या पायाशी, कुशींत विसावेन;
निदान ज्याच्या मार्गप्रतीक्षेंत राहीन—
कुणीही नाही.

थकून जेव्हा
या वैराण धुळींत मी भोवळून पडेन,
जवळ-दूर
        कुणीही नसेल.
ईश्वरा!

२.

पुढे-मागे सभोवती, स्वतःला आपणहून जखडून
आजपर्यंत आयुष्य घालवलें. वाढलों,
वाढणें निसर्गनियमाने झालें. निसर्ग
प्रयोगशील विकसनशील. बांधलेलें आयुष्य
फुलांना नाक मुरडणारें नसेल कदाचित्.
नाकांतून धूर जो वाहतोय उष्ण,
आणि मानेल तसा तो सतत वहातोय,
ही कृपा ईश्वराची; ज्याने
वरचींखालचीं-भोवतालचीं टोंके घट्ट आपल्या
मुठींत धरून ठेवलेलीं.
मी : एक कळसूत्री बाहुली.

३.

जाणवणाऱ्या-दिसणाऱ्या परिचित-अपरिचित
विस्तारांतून भ्रमंती केल्यावर, कांही अनुभव
भाकरीच्या तुकड्यासारखे भुकेल्या वेळीं
चघळतां येतात. अनेक पिशाच्चें प्रश्नचिन्हांचीं तरीही,
आयुष्याच्या पठारावरून, अरण्यांतून
भटकतात.
विस्तार भयाण असला, तरी शांतपणे
त्याची सविस्तर छाननी करतां येते;
प्रश्नाचें येणें-जाणें सहजसुलभ समजून
त्यांचा विचार टाळतां येतो.
आयुष्याला ईश्वरेच्छा मानून
दंग राहतां येतें स्वतःत.
हिशेबाचा एक वजा करून
मावळणाऱ्या दिवसांचा मेळ
उगवणाऱ्यांशी घालून जगतां येतें विस्ताराने.
ईश्वरा !

४.

या माणूस नांवाच्या प्राण्याचा संपूर्णपणे निःपात होऊं दे.
तुझा रोलर आणि बुलडोझर हे प्रभो,
फिरव आता यांच्यावरून,
घरादारांचा चुराडा कर.
मुळासकट उखडून टाक प्रत्येक जीविताला.
पृथ्वीचा गोळा दुसऱ्या ग्रहावर भिर्कावून चक्काचूर कर.
अनंत आकाशांतून
तुझे निळे श्वासच फक्त वाहूं देत निर्विकार.
पुन्हा मला जिवंत कर एकदाच क्षणापुरता;

आणि डोळे उघडून तुझी ही कर्तबगारी पाहिल्यावर,
मारून टाक कायमचा,
तूं रहा त्यानंतर आकाशभरून... नसल्यासारखा.

५.

...तेव्हा
शरीरांतून थंडगार ज्वाळ भडकेल. दिशांचीं चाकें
अंतरिक्षांत घरघरतील. सूर्यापासून
असंख्य मळूल सूर्य सभोवती
फेर धरतील. ईश्वराच्या आधाराला
हात पोचणार नाहीत. गरारणाऱ्या विश्वांतून
फेकलें जाईल आयुष्यावर
आकाशाचें पांघरूण.

## कवितेची ओळ

अचानक अशी
कवितेची ओळ
मनाच्या कोपऱ्यांत चुळबुळते,
आणि एकांताच्या उदास सावल्या
उन्हें झाकोळून टाकतात. गार वारे
सुस्कारतात गवताच्या गंजी
पिस्कारीत शरीरभर.
नदीचा काठ डोळयांसमोरून सरकतो.
ढग दाटून येतात...कष्टप्रद
भयाण जंगलांत आडवाटेला
वाळलेल्या पातेऱ्यावर पावलें पडतात;
फक्त त्यांचाच आवाज करकरीत
                    ढळत्या सांजेसारखा
हृदय व्यापून असतो.

## रस्ते निर्मनुष्य झाले तेव्हा

रस्ते निर्मनुष्य झाले
तेव्हा तो सावलीसारखा
समुद्रावर आला. ऊर भर-
भरून त्याने श्वास घेतला,
विस्फारित त्याच्या डोळयांनी
काळोखांतच दूरवर कांही शोधलें,
झपाटलेल्या वाऱ्यासारखा
ओलसर वाळूंतून तो धापावत निघाला.
उमटलेल्या पावलांचे ठसे ओरबाडलेल्या
पाल्यापाचोळयासारखे मागेमागे जात राहिले;
अमानुष बेहोषींत तो पुढेच निघाला कोलमडत.
पाय थकले तसा
वाळूंत कोसळला.
तडतडणाऱ्या त्याच्या डोळयांत ठिणगी पेटली.
तो कोसळला;
तरीही रांगत निघाला.
सूर्याचीं किरणें भुईवर उतरूं आलीं,
तसा सगळें बळ एकवटून तो उठला;
आणि बेंबीच्या देठापासून
त्याने कुकारा घातला.
वाळूंत गडबडा लोळत
मुठी भरभरून त्याने
आपल्या पिस्कारलेल्या केसांत वाळू भरली.
वाळूंत तोंड खुपसून
तो निपचित झाला.

सूर्याचीं ओलसर किरणें वर्दळून
त्याच्या प्रेतावरून बागडत गेलीं.

## दावेदार

दावेदार :
घरदार,
बायकापोरें,
अब्रू,
प्रतिष्ठा,
पोट,
घड्याळ,
पैसा.

दावेदार :
जन्म,
आयुष्य,
मी माझा

# सूर्याच्या पांच कविता

## १.

मी निद्रिस्त असतांना स्वप्नामध्ये
तुझे पदरव ऐकले. गवतावरून
सळसळणारे वारे तुझ्या स्पर्शाने
उजळत असतांना किलबिलणाऱ्या
उजेडांतून मला जाग आली. तेव्हा
गुलाब फुलले ते मी अलगद
पापण्यांवर झेलले. आळसावलेलें
सर्वांग हुरूपलें, तुझे सनईसदृश किरण
प्रकटले जेव्हा.

पुन्हा सकाळीं
तुझ्या स्पर्शाने वारे उजळत असतांना
किलबिलणाऱ्या गुलाबांतून
तुझ्या उदयापूर्वी तुझ्यांत
मला अस्तंगत होऊं दे.

## २.

सूर्योदयासवें इच्छिलेलें सूर्यास्तानंतरही
नंतरचे अनेक दिवस आणि रात्री, अनेक
ऋतूंतून ग्रहराशीसारखें
मनांतलें अपरिहार्य स्वप्न होऊन फिरत राहिलें.
आयुष्यांतील बऱ्यावाईट, उंचसखल प्रसंगांतून तारून
त्यानेच येथवर मला सोबतीने आणलें;
ही त्या सूर्यदेवाची कृपा

ज्याने आपले स्वच्छ किरण सौंदर्यमान
माझ्या अंतरंगांत स्पष्टपणे रोवले प्रथमतः

नशिबाला दोष देत जगणें ही सवय तर जुनीच आहे.
जुलमी विचारांच्या पायांखाली चिखलांत
स्वतःला तुडवीत रहाणें नेहमीचेंच आहे.
जगणें फक्त खरें आहे एवढेंच त्यांतलें तात्पर्य.

सूर्योदयासवें जें स्वप्न मनांत रुजलें त्याचे कवडसे
नंतरही रात्रवेळीं ढगाळ मनांतून हलत असतात.
आयुष्यच गहाण ठेवायची वेळ आली,
आणि नशिबांत गुरफटलेला देह फाटला,
तरीही
डुचमळणाऱ्या मनाच्या खोल तळाशी हे कवडसे
हलत रहातात. विपत्तीच्या वेळींही
ते मृत्यूचा तिरस्कार करतात.

३.

सूर्याच्या साक्षीनेच आजवरचे कित्येक दिवस माझे
मीं कित्येकांना दान दिले.
कित्येकांनी जबरदस्तीने माझ्यापासून
हिरावून नेले.
सूर्यसाक्ष एकही दिवस मीं
माझ्यासाठी ठेवला नाही. आता मात्र

माझ्यासाठी सूर्यासह आणि
सूर्यासाठी माझ्यासह एक दिवस मी
राखून ठेवणार आहें. त्या दिवशीं
सूर्य माझ्या अंतःकरणांत उगवेल.

मी त्याच्यासाठी आकाशाचें छत
लावून ठेवीन. मी गवत, झाडें, पक्षी,
सरोवरें निर्माण करीन.
त्याच्या मावळण्याच्या क्षितिजामागे
एक समुद्र असेल.
सूर्यसाक्षीने मी
आणि माझ्या साक्षीने सूर्य; असे
कित्येकांना चुकवून कित्येक
दिवसांनी एकाच दिवसांत
बुडून जाऊं.

४.

सायंकालीन सूर्य
मलूल माझ्या डोळयांत मिटलेला.
कित्येक शतकें बसल्यासारखा
या समुद्रकिनाऱ्यावर जुनाट
मी बसलेला—
सायंकालीन मलूल. आता

माझ्या डोळयांतील सूर्य
मंदावूं लागेल. एकाएकी
समुद्राची गाज दबत जाईल.
संमिश्र रंगाच्या ढळत्या सावल्या
अशुभासारख्या आसमंतांत मिसळतील.
डोळयांतून सूर्य संदावतांना
मी एकाकी गाडला जाईन स्वतःतून
स्वतःत जुनाट वास्तूसारखा; एकाएकी
समुद्रपक्ष्यांचा थवा

माझ्या अंगावरून चीत्कारत
पुढे जाईल.

५.

अंतिम सूर्यास्त संध्याकाळीं
झाडांतून, वाऱ्यांतून विरत जाईल
आकाश सावकाश. सामसूम
समुद्रांत
क्षितिजकाठांना घेरून एक आर्त साद
थरकांपत येईल माझ्या
डोळयांचा वेध घेत.

माझ्या डोळयांतील सूर्यास्ताचे रंग
अधिक उजळतील,
मालवण्यापूर्वी.

## स्थिरचित्र

सरडा.
तेरडा.
पळस.
कळस.
सोनावळ.
सर्पशीळ.
जास्वंद.
पायवाट.
धूळ.
तडकलेल्या बिया.
कुसळसुया.
सुतारपक्षी.
चुकार ढोर.
सुजीर डोळे.
कावळे.
दुपार :
पांगाऱ्यावर
सूर्य लाल.

## मीं म्हटलें

मीं म्हटलें सूर्याला, तूं
तिच्या अंतरंगांत उगव;
तिच्या सकाळी, दुपारी आणि
संध्याकाळी मला तिच्या
सावलींत राहून पाहूं देत.
तुझें अस्तित्व मात्र
तिला कळूं देऊं नकोस.

ती येईल जवळ माझ्या; तेव्हा
सकाळ तिच्या अंतरंगांत होऊं दे.
ती येईल अधिकच जवळ, माझ्यांत
स्वतःला विसरूं बघेल, तेव्हा
संध्याकाळ होऊं दे; आणि
ती माझ्याच अंतरंगांत माझ्याहून
दुसरी असणार नाही, तेव्हा
तूं माध्यान्ही ऐस. आमच्या
सावल्या परस्परांत विरून जातांना
तूं पहा.

# संपूर्णपणे वेगळी

तिला संपूर्णपणे वेगळी
करतांच येत नाही
सूर्योदयाशिवाय, आणि सूर्याला वगळून;
आणि सूर्याची अपरिहार्यता सूर्यास्तासह
माझ्याही आयुष्यांत मूलभूत.

ती संपते ज्या पानावर पूर्णांशाने, तिथून
माझीं पानें चाळलीं जातात.
आकाशाचे दोन भाग सूर्यलक्षी; दोन
स्वतंत्र पानांची चळत.

तिला जाग येते, तेव्हा
गुलाबबनें फुललेलींच असतात;
तीं तिच्यासाठीच सर्वार्थाने. मी
वाट पहातों
सूर्यास्ताची व्याकुळ
संध्याकाळ मला घेरीत येते—
 मुरलेल्या तापासारखी दुःखछाया माझ्या सर्वार्थाला
व्यापून उरते; तेव्हाही

ती रंग खेळते गुलाबबनांत.

## चढउतार

वाऱ्यांतून फाटलेल्या धुक्यासारख्या
शिथिल गात्रांना, वेग वाऱ्याचे
आता साहवत नाहीत. धुक्या-
पलीकडे वाहणारी चकाकती नदी
ओलांडण्यासाठी प्रथम
वाळवंट पायांखाली घालावें लागणार,
हें थकलेल्या गात्रांना अगोदर समजतें.
हे असे आलेख रेखून
ठेवल्यासारखे चढ-
उतार आयुष्याला मानवत नाहीत. एका
निश्चित रेषेच्या टोकाला पुढे
जाण्यासाठी जागा नसते, हें
रेषेच्या शेपटीवर पाय ठेवण्याअगोदर
जाणवतें; आणि सावचित्त दैव तरीही
माझ्यासमोर मोजून
एक रेषा आखतें...माझ्या
पायांपासून नदीपर्यंत; आणि
वाऱ्यांतून फाटलेल्या शिडासारखें
आयुष्य फडफडतें पंख गाळून.

# बी

प्रत्येकाच्या हृदयाच्या जागीं
मी पहातों
हृदयाच्याच आकाराचें
बी;
पिंगट करडें.
प्रत्येक श्वासासरशी तें
स्फुरतें, दबतें, आणि
कधीकधी
त्याच्यांतून कोंभसुद्धा फुटतात;
आणि फुटलेले कोंभ मिटून
पुन्हा बी कायम.

सहज एकदा
छातीवर हात गेला.
वाटलें,
माझ्याच छातींत बी नाहीय.
मी चरकलोंच;
पण धीर करून पाहिलें;
हलकेंच बी काढून
तळहातावर घेतलें.
म्हटलें,
हें जर इथे नसतें,
तर
मी हार्टफेलने मेलोंच असतों.

## मी नसेन

वाऱ्यावर वाहवलेलें आयुष्य,
आणि कुठेही पाय ठेवायला जागा नाहीय. मी
माझ्या स्वप्नांना समांतर वहातोंय. उघड्या डोळयांनी
भोवताली गरगरणाऱ्या अफाट विस्तारांतून मी
वहातोंय. माझीं स्वप्नें चिखलांत
रुतलेल्या चांदण्यांसारखीं; आणि हातांना
मातीचे डागही नाहीत. मी स्वच्छ
कोरडा, कोरडल्यासारखा.
मी असाच दूर जाईन; दूरावरून
दूर माझ्यापासून. माझ्या अस्तित्वाचे रंग मी
ओळखूं शकणार नाही. माझें नांव
आपोआपच पुसट होत पुसून जाईल. मग मी
मी नसेन. मी नांव देण्याजोगें एक वस्तुमात्रही
नसेन. माझा माझ्याशी, त्यांच्याशी, कुणाशी संबंध-
लागेबांधे नसतील. वर आकाश असेल, खाली
पाणी आणि जमीन. मी
नसेन; कधीही, केव्हाही, कुणाचा, एवढाही.

## मृत्यूची एक कविता

१.

मेंदूंतील रक्तस्रावाने मी मरेन,
किंवा मरेन हृदयक्रिया बंद पडून.
मरणाच्या अनेक शक्यता; परंतु
मी निश्चितपणे सांगूं शकतों की
मी नैसर्गिक मरण मरेन, कृत्रिम
कारणांनी; आणि मी
स्वप्नांत असतांना मरेन.
मी मरेन झाडाखाली, नदीच्या
वळणावर मी मरेन, आणि
प्रवासांत असतांना; आत्तापासूनच
माझी त्वचा मातीच्या रंगाची दिसूं लागलीय.

आयुष्यांतील गेलेले दिवस मी मोजणार नाहीं.
येणाऱ्या दिवसांचीं स्पष्ट उन्हें मीं कित्येकदा स्वप्नांत
अंगावर घेतलीं आहेत आणि मीं
माझे डोळे वृद्ध होतांना मला उतार-
वयी होऊन पाहिले. मी सतत म्हणूनच
माझ्या मृत्यूसंबंधी निश्चिंत राहिलों. माझ्या
मस्तकांत अविरत सूर्याचें चाक गरगरतें आहे; तें
ज्या वेळीं आसांतून निखळून पडेल, त्या वेळीं
मी मरेन.

२.

मी खूप खोलवर पाहूं शकलों. मी
भविष्याच्या अंतिम उन्हाळयांत
धुळीसारखा भरकटलों. मीं
माझ्या आयुष्याचें विश्लेषण करण्याआधी
संपूर्ण स्वतःचें विच्छेदन केलें. पाहिलें तें
भयानक होतें. म्हणजे सत्य, सूर्यासारखें
ढळढळीत. मी रक्तांतील जुगारी वृत्तीचा
एक खेळ असल्यासारखा प्रामाणिकपणे
जगलों; आणि स्वतःतून बाहेर
निघालोंच नाहीं. पल्याडचे रस्ते माझ्या पायांना
चक्रावून गेले, आणि मी अल्याडच्या ठराविक
वाटांनी चालत राहिलों. आता

मी सैरभैर तरीही आत्यंतिक निर्विकारपणे
इतरांना सामोरा जातों. स्वतःला
अलिप्त ठेवून प्रखरपणे
परिस्थितीला दटावूं शकतों, आणि सूर्याच्या
चाकाची एखादी ठिणगी मला दिवसच्या दिवस
माझ्यापासून तोडूं शकते. एवढ्या गदारोळांत
मी कुणाचाच नसल्यासारखा माझाही नसतों,
आणि मी मरण होऊन स्वतःलाच घेरतों.

३.

कशाचाही अर्थाअर्थी संबंध नसतांना
अनर्थ तेवढे होताहेतच, आणि मी
त्याबद्दल कांहीकांहीच आश्चर्य अथवा
अढी ठेवली नाहीय. मेलेल्यासारखे

वृद्धत्वापर्यंत येणारे पुढील
कित्येक दिवस मीं
माझ्यांत कायमचे गाडून टाकलेयत; आणि
माझ्या डोळयांपुढे मीं जोपासलेंय फक्त
एक झाड,
वळणाची नदी,
आणि प्रवासाचा अंतिम टप्पा.

४.

छातीवरले हात विस्तारून
छाती मातीला भिडवून मी मरेन.
मी माझ्या मेंदूंतील तळपत्या उन्हाची काच
मेंदूंतच खुपसून मरेन.
जळजळणारा रक्तस्राव
बद्द माझ्या निरुपयोगी अस्तित्वाला बुडवून टाकील, पुढे
उगवणाऱ्या प्रत्येक दिवसासह; आणि
माझी सावली
सूर्याच्या दिशेने झेपावत नष्ट होईल.

## प्रार्थना

उन्हाच्या उंबऱ्यावर उभा राहून मीं सूर्याची
प्रार्थना केली
घराकडे पाठ फिरवून, की
माझी सावली जमिनीवर या मर्त्य
लोकांत न पडेल असें कांही कर;
किंवा तूं हृदयांतूनच उसळी मारून वर ये;
आणि मला प्रकाशमान करून भस्मसात कर.

अजूनही मी
वेळींअवेळीं घराबाहेर उन्हांत
उभा, सावलीला
पायांखाली तुडवीत.

## परिसर

जागोजाग थकलेलं उन्ह खुरटलेल्या सभोवारावर.
जीर्ण गवती सूर्य मावळण्याच्या अंतरावर.
सूर्यफुलांचा परिसर अंधारलेला डोळयांत;
आणि उन्ह पिवळेपणाचा अर्थ
नासलेलं. फिक्कट

आयुष्यासारखंच अर्थविहीन.

## प्रार्थना

उन्हाच्या उंबऱ्यावर उभा राहून मीं सूर्याची
प्रार्थना केली
घराकडे पाठ फिरवून, की
माझी सावली जमिनीवर या मर्त्य
लोकांत न पडेल असें कांही कर;
किंवा तूं हृदयांतूनच उसळी मारून वर ये;
आणि मला प्रकाशमान करून भस्मसात कर.

अजूनही मी
वेळींअवेळीं घराबाहेर उन्हांत
उभा, सावलीला
पायांखाली तुडवीत.

## परिसर

जागोजाग थकलेलं उन्ह खुरटलेल्या सभोवारावर.
जीर्ण गवती सूर्य मावळण्याच्या अंतरावर.
सूर्यफुलांचा परिसर अंधारलेला डोळ्यांत;
आणि उन्ह पिवळेपणाचा अर्थ
नासलेलं. फिक्कट

आयुष्यासारखंच अर्थविहीन.

# गुडघ्यांत मान खुपसून

गुडघ्यांत मान खुपसून मी बसून राहिलों.
मी भर वस्तीच्या रस्त्यावर एकदम दचकलों.
स्वप्नांतून मी बरळत जागा झालों.
संध्याकाळच्या सरकणाऱ्या काळोखांतून
मी माझ्या अमानुष एकटेपणाला भ्यालों.
चारचौघांदेखत मीं कपाळावर हात मारला.
त्या सुंदर स्त्रीच्या पोटांत वळवळणारें
किळसवाणें आतडें असेल, शिवाय मूत्रपिंड
आणि गुदद्वार.
माझ्या हृदयाचा देठ पिळवटलेला असेल,
तो तुटूं आला आहे काय ?
सिग्रेटच्या धुरांतून कॅन्सरचें आमंत्रण,
श्वासनलिकेला भोकें, फिक्कट शरीरचिपाड...चूप.
मी बोललों की माझ्या छातींतून कळ येते.
महारोग्यांच्या हातांना बोटांचीं कलमें
करतां येतील काय ?
हातापायांना कांपरी येतेय.
बंदुकीची एक गोळी एकेका माणसाला
औषध म्हणून द्यावी, सर्वप्रथम
ती सुखी माणसानें घ्यावी...सर्वांचीं
बोटें माझ्याचकडे रोखलींत काय ?

## दारूची एक कविता

१.

मी उभा रस्त्यांना मधोमध. पावलांना
दिसताहेत ते दोनच राजरस्ते.
एक : घराकडे जाणारा
दुसरा : गुत्त्याकडे वळणारा. माझे
पाय दोन, दोन दिशांना. (मी
जरासंधाप्रमाणे फाटेन काय ?) डाव्या
पायाला एक सूक्ष्मशी थरथर, एक
आकस्मिक टेकू दिल्यागत उचल,
एक रक्ताची वेल सरसरत वर–
वर चढतेय; डाव्या
बाजूचा रस्ता ओढाळ ओढतोय.
निरुपाय. मी सिग्रेट पेटवतोंय,
काडी फेकायला डावीकडेच
झुकलोंय आणि आपसूकच
उजव्या पायाचा डावीकडे टर्न.

२.

हा रस्ता सरसरत जाणाऱ्या
सरड्यासारखा कुंपणाबाहेर. इथे
जागोजाग अंधार आणि
खाचखळगे. रात्रीचा उत्साही
वारा माझ्या डोळ्यांवरून, कानांवरून
वहातोय. रस्त्यावरील दिव्यांचे

भगभगीत प्रकाश मला ओळख
देतायत. माझ्या समोरील हा वाम–
रस्ता माझ्या पावलांचे शिक्के,
वजन आणि थर्थर जाणतोय;
आणि माझ्या हृदयांतील धाप. आता
नजर थिरावतेय एकाच
दिव्यावर, समोर किंचित
आत.

३.

आता माझ्या चेहऱ्यावरील
पिवळलेलीं पानें
गळूं लागलींयत, आणि माझा
चेहरा पुन्हा नवीन होतोय. रंध्रारंध्रांतून
माझा चेहरा लगडतोय, तांबूस
पालवीने बहरतोय. हा
पहिला पेग. आणखी
एक अचानकच असें रक्तवेलीचें कारंजें
फुटल्यासारखें शरीरांत, आणि
रक्तगर्द फूल मस्तकांत उमललेलें,
आणि लाटा वेलींच्या वेलींत वलयदार.
वळणदार सिग्रेटीचा धूर माझ्या
लवचिक श्वासांत,
आणि श्वासांतून बाहेर डोळयांसमोर
लखलखतेय एक हलकीशी धुंद
बेहोषी. (होषमें आव यार !) हा
दुसरा पेग. आणखी
मला असे भास होताहेत,
माझे डोळे अजूनही शाबूत असतांना,

की प्रत्येकाशी बोलतांना मी अधिकाधिक
पसरट आणि उंच होत जातोंय, आणि
मी त्यांच्यावर पसरतोंय सावलीसारखा.
माझें एक विलक्षण व्यक्तिमत्त्व; मी
एकेक शब्द उच्चारतोंय मंत्रवत्.
हेऽऽ माझ्या हजारों कोसभर पसरलेल्या
हिंदुस्थानांतील बेवडेबाज बंधूंनो!
पहा, या आपल्या शरीरांतील रक्ताची
जात एकच आहे. (टाळ्यांचा
प्रचंड कडकडाट.) हा माझ्या
चेहऱ्यावरील पुष्पगुच्छ आत्ताच
फुललेल्या गुलाबाचा मी तुम्हांला
अर्पण करतोंय. हा
तिसरा पेग.

४.

काचेचा प्रचंड ग्लास, बर्फासारखा चकचकीत. त्यांत
सोनेरी दारू. काठोकाठ भर-
पूर फेस. मी
दारूंत गटांगळ्या खातोंय. मी
दारूंत पोहतोंय. मी
दारूंत खोल खोल जातोंय. या
ग्लासाच्या तळांतून मी पहातोंय
चकचकीत चंद्र
ग्लासमध्यावर उगवलेला,
आणि अधिकाधिक चमचमणारी, उष्ण होणारी
दारू. चंद्रकिरण दारूंतून माझ्या
डोळ्यांवर, माझ्या अंगावर,
माझ्या पांढऱ्याफेक

कपडयांवर. मी ग्लासाच्या
तळाशी उमर–
खय्यामी स्वप्नांत, किंवा मी वर
येऊंच इच्छित नाहीय ?

५.

आता खूपखूपच शांत आणि
खिन्न वाटतंय. आता मी
स्वतःशीच बोलतोंय. मी
माझ्या सर्वांगाचें निरीक्षण करतोंय.
हा माझा हात.
हीं माझीं बोटें.
हीं नखें.
हे हातावरले केस.
हा तीळ.
ही जखम.
ही पुळी.
या तळहातावरील रेषा. (फुटकें नशीब.)
माझ्या हातावर रंध्रें किती ?
माझा हा हात कसा खराखुरा दिसतो !
किंचित् जड, किंचित् हलका,
किंचित् सुरकुतलेला, निर्जीव
झाडाच्या वाळलेल्या फांदीसारखा.
हा हात माझा नाहीच. का हा असा
माझ्यापासून वेगळाच दिसतोय ? आता
पायसुद्धा जमिनीवर ठरत नाहीत,
ठार बहिरे झालेत काय ? अरे,
कोणी हा समोरचा दिवा एकदम
माझ्या डोळयांतच घुसवलाय ?

नजरेसमोर फाटलेल्या प्रकाशाच्या
चिंध्या हलतायत. हवा हलतेय
आणि शरीरांत कसली
ही घाल–
मेल चाललीय?

६.

थंड
गार वारा माझ्या चेहेऱ्यावर,
डोळ्यांवर, थंड
गार वारा माझ्या हातांवर,
पायांवर, थंड
गार वारा. मी
परतलोंय ओळखीच्या रस्त्यांनी,
मी परतलोंय घराकडे ठराविक
खुणांनी. मी परतलोंय
घराकडे. दूर
आणि जवळ सुन्न वातावरण कुंद,
विमनस्क. माझे पाय जड, अंग
जड. ही रात्र भराला आलीय
की ओसरतेय? जवळचे
सगळे दूर गेलेत,
तर दूरावरले दूरच बरे.
मी तर माझ्याजवळ. माझा, माझाच होऊन
आता पायांना रस्ता एकच :
उजवीकडचा : घराकडे परततांना
चेहऱ्यावरील जून पानें गळत, मी
घराकडे वळत.

७.

ही रस्त्यावर पसरलेली माझी सावली
की मी? आणि मी सावलीसारखा
मागाहून जातोंय निर्बुद्ध.
या शांत रस्त्यावरील धुळीला
एक वेगळाला वास, या
आसमंतालाही एक हुरहुरणारा
भास. माझ्या श्वासांतून खोल
फुफ्फुसांत शांत. रक्तवेली
कोमेजताहेत. माझ्या पायांना
अचूक ओढतोय रस्ता उजवीकडे,
दिशांचीं नावें काळोखलींत
मागे-पुढे.

८.

दिशादिशा,
अवदशा,
अवकाळ,
सर्वकाळ
दुष्काळ.

९.

मी पहातोंय स्वस्थचित्त
माझ्याच प्रतिरूपाकडे.
माझ्या दुष्काळी चेहऱ्यावर
त्याची तिरस्कृत नजर, गिळंकृत
करीत माझे मुखदुर्बळ राग आणि

कोंडलेले अहंकार. मी
पहातोंय किंवा पहात नाहीय.
मी तटस्थ रोवलेला,
अथवा लटकलेला. त्या त्याच्या
चकचकीत गार वेटोळलेल्या
डोळ्यांतून मी कधीच पलीकडे
पोहोचलेला; आणि माझें प्रतिरूप पहातेंय क्रुद्ध
माझ्या कलेवराकडे
विषारी आततायी अट्टाहासाने.
मला बोचकारतेंय, जाळतेंय, फिस्कारतेंय.
माझ्या गाडलेल्या रस्त्यांचें
उत्खनन चाललेंय.

## चळत

वाऱ्याची चळत उलगडत उलगडत जावी;
पुन्हा वाऱ्यांत वारा अशी चळतच.

आकाशांत आकाशें सरमिसळावीं.
छातींतून थंडगार रातराणीचा सुवास हलावा.

मी कडवट
मघाशी जें बोललों, तें विसरूनही
तूं माझ्या स्वाधीन व्हावं, मनासहित संपूर्ण.

वाऱ्याची चळत उलगडत उलगडत...

## उभं आयुष्यच जळतंय

उभं आयुष्यच जळतंय;
आणि तें जळण्यासाठीच जन्मलंय.
आता विचारूं नकोस की तें कां जळतंय ?
आणि तें जळण्यासाठीच कां म्हणून जन्मलंय ?
जन्मलेलं जळायचंच; तर तूं
पहा. पहात रहा. त्याला
तसं कांही उत्तरच संभवत नाहीय.
खरं तर तसा कांही प्रश्नही नाहीय.
तुला हें स्वीकारायचं नसेल,
तर हें आव्हान समजून दुसऱ्या बाजूने
पर्यायी प्रयत्न कर. तुला कळेल
की पाऊल ठेवायलाही
निखाऱ्याशिवाय जागा नाहीय.

## चौसोपी

दावणीला बांधलेल्या गुरासारखा
मी वाळलेलं गवत खातोंय,
आणि माझ्याच शेणामुतांत रांगतोंय.

दावणीला बांधलेलं हें आयुष्य,
चौसोपी :
उन्हाचं छत असलेलं नशीबवान.

## मी सांगतोंय

मी तुला, तुला, आणि तुलाच सांगतोंय—
तूं ऐक.
तुला तें ऐकावंच लागेल.
तोंड घट्ट मिटून
तूं ऐक.

मी दारू पितों.
मी लिहितों.
मी जुगार खेळतों.
मी सभ्यतेने वावरतों.
जसजसा मी अधिकाधिक बाहेरख्यालीपणा करीन,
तसतसा मी अधिकाधिक तुझ्यावर प्रेम करीन.

मी हसतों हें तूं समजूं शकतेस.
मी रडतों हेंही तुला कळायला हवंय.

माझ्या प्रत्येक कृतीचं समर्थन करायला
मी बांधील नाहींय
आणि मी तें करणारही नाहींय;
कारण प्रत्येक कृतीला तिचं असं
पर्यायी समर्थन त्या कृतीपूर्वीच
निर्माण झालेलं असतं.

तूं ऐक.
मी तुलाच सांगतोंय
म्हणून ऐक.

## आक्रोश

मी फक्त आक्रोशूं शकतों. कोसच्या कोस
पंचक्रोश फक्त आऽऽ
क्रोश. मी आक्रोशतों झाडांतून,
वाऱ्यांतून, की झाडंवारे माझ्यांतून ?
आकाशासहित आसमंतांत फक्त आऽऽ
क्रोश. माझ्या पोटांत एक
अफाट वाळवंट उगवलंय आणि
तोंडावाटे धुळीचे लोटच्या लोट
बाहेर पडताहेत. पंचक्रोश
धूसर आक्रोशलेला. सूर्यावर
दुसरं एक वाळवंट पसरतंय, धूळच
धूळ. धुळीचं साम्राज्य. आसपास,
आतबाहेर फक्त आऽऽ
क्रोश.

हें असं झालंय तरी काय ?
हें असं माझ्याच शरीरांतून
गजबजून वादळ कां फिरतंय ?
मी दुसरंतिसरं कांही करूंच
शकत नाही काय ? नुस्ता
आक्रोश आऽऽ

कोसच्या कोस झाडं फक्त
पानंच गाळताहेत. वाऱ्यांतून
धुळीचे लोट उठताहेत. सूर्याच्या
अंगावरील वाळवंट चरत

चरत खाली झिरपताहे, आसमंतांत
धुळीचा आक्रोश.

त्या पलीकडच्या बाजूने आकाश
खाली खाली खचताहे. तें आता
धूळच होऊन या पंचक्रोशांत
हळूहळू उतरेल काय ? एकेक
थर कोसळतोय ढगासारखा, दबत
दबत खाली येतोय. मी
आता करूं तरी काय ? मी
फक्त आक्रोशतोंय; आणि धुळीचे
वारेच फक्त माझ्या तोंडावाटे
बाहेर निघतायत.

अंधार. अंधारलंय का ? की
डोळेच मिटलेयत, फुटलेयत ?
माझ्या डोळयांतून सुद्धा धुळीचे
लोटच निघताहेत काय ? अंधार.
अरे, आता तर सूर्यसुद्धा
धूळ उडवीत घुमश्चक्रीसारखा
या अफाट वाळवंटांतून धूसर
घुमतोय. हा आवाज मला ऐकूंच
येत नाहीय काय ? काळ्याकुट्ट
प्रकाशांत एक उजळसा काळा
गोल घुमतोय, आणि
हें आश्चर्यच की सगळीकडे
सामसूम झाल्यासारखी कशी
अचानकच. हा नक्कीच अंधार.
एक पान नाही, की वाऱ्याचं
सूत नाही, की चत–

कोर आकाश नाही. नुस्तं सुन्न
सुनं. एक एकच एक वाळवंट पसरतंय आ
क्षितिज. आणखी एक रात–
किडा या भयाण वाळवंटांत
माझ्या छातींतच आ ऽऽ
क्रोश पोखरतोय.

## सूर्यरोग

सरसरत येणाऱ्या प्रकाशलाटांतून
माझ्या डोळ्यांत एकदमच तेजाळ
जाळ घुसला, सूर्यकिरणांचा
चमचमता समूह डोळ्यांतून अंधारला : हा
सूर्यरोग सूर्यापासूनचा.
त्यानंतर कित्येक सकाळीं,
दुपारीं, संध्याकाळीं तेजःपुंज
सावलीसारखा तो पसरला माझ्या
मनांत संपूर्ण समूळ. तेव्हापासून
या एकाकी जंगलांत मी उभा,
वृक्षासारखा माथ्यावर झेलीत सूर्य. सूर्याचा
प्रत्येक किरण पानांच्या शिरांतून जपत, आणि
खोडांतून मुळापर्यंत किरणसूक्तें लाटांप्रमाणे खेळवीत;
जणू माझ्यांतच आजन्म
स्वतःला संपूर्णतः गाडून घेतल्यासारखा सूर्य,
आंधळ्याप्रमाणे.

# अलीबागचा समुद्र

समुद्राची नि आमची ओळख
मेल्यांतच जमा होण्याइतपत दिवस गेले,
तेव्हा सणकत्या मस्तकांनी आम्ही एक दिवस थेट
अलीबागच्या समुद्रावर थडकलों;
कपडे उतरवले आणि धावतच
समुद्रांत बुडालों.

रात्रभर स्वप्नांतसुद्धा पोहतांना
मी एकदमच समुद्राच्या तळाशीं गेलों, तर
हातांत सकाळचा पेपर; आणि
पेपरांत एक विलक्षण बातमी :

काल दुपारीं अलीबागला सतीश आणि शरद या दोन मित्रांत
समुद्र पोहायला गेला असतां, समुद्राचा
बुडून मृत्यु :

ईश्वर मृतात्म्यास शांति देवो.

## उद्यासाठी

सांगून समजण्याजोगं होतं,
मीं समजावलं नाही.
मागून मिळण्याजोगं होतं,
तेंही घेतलं नाही.

मावळणाऱ्या दिवसाला मीं
एक एक सूर्य अर्पण केला;
अशासाठी की, पुन्हा दिवस उगवणारच आहे,
तर उद्यासाठी जगावं.

प्रत्येक सकाळीं नवीन बी रुजत घालण्याचा निर्णय घेतला,
निश्चयाप्रत गेलों नाही;
उद्यासाठी जगलों, तरी
कालचा दिवस मेला नाही.

## गळालों

मी वाळत चाललों.
प्रथम
देठाला पिकल्याची
भावना झाली.
नंतर
मी गळतोंय की काय,
असं वाटलं.
मध्येच
एक हिरवी रेषा
जाळीसारखी पसरली
अवघ्या
आयुष्यावर.
पुन्हा अघटित
घडणारं नव्हतंच, असं
समजून मी
गळालों.

# सुखसण

आयुष्याच्या उस्तवारींत
चार-दोन सुखसण आले.
आले                    गेले—
माझ्या मुलानं मला झोका दिला.
रस्त्यावरून खारीसारख्या
चपळ मोटारी पळाल्या.
पांगाऱ्याला लालभडक फुलंच
फुलं आलीं.
समोर पाहिलं, तर मी
समुद्रावर उभा असल्याचं दिसलं; आणि
दूरवरून पाऊस येतोय.

चार-दोन सुखसण आले—
—गेले
मी झोपाळ्यावर बसलोंय रडकुंडी.

## कविता

स्वयंभू जसं आकाश
तशी कविता अनादी.
वाऱ्याचे हातही पोहोचत नाहीत जिथून
जिच्यापल्याड.
ती दाही दिशांना
मोकळी;
आणि माझे शीड फाटलेले हात,
मन
आणि सगळंच अज्ञात.
ना उजेड, ना काळोख.

वाऱ्यावर उमटलेलीं पावलं
माझींच,
फाटलेलीं.

# जें दिसतं दिशांना

जें दिसतं दिशांना
दिशांनी,
तें दिसतं मला
आतून.
दाही दिशा माझ्यांत.
मी आतून विस्तारलेला कक्षेपल्याड.

मी वाऱ्यांतून जन्मलों.
मी मातींत मळलों.
मी वाढलों, तेव्हा
माझ्याहून उंच आकाशाला
मी भ्यालों.

आकाशाच्या कक्षेपल्याड मी विस्तारलों,
आणि आकाश माझ्या
हृदयाहून हसलं.

## हसलों

दिवस उजाडत आले
आणि मावळले,
उजाड अंधकाराहून धूसर मी हसलों.

संकल्पांच्या ओळी
सूर्यकिरणांत झगझगल्या, तेव्हा
प्रथमच मी मनाहून हसलों
असण्या-होण्यांतील वैयर्थ्य जाणून.

होणं नाहीच,
होणारं नव्हतंच;
हें मी माझ्यांतील फारकतीपूर्वी ओळखलं.

आणि फाळणीला प्राणाच्या
धुगधुगत
हसलों.

## नव्हतों

शपथपूर्वक मी नव्हतों
जेव्हा खोदकाम झालं,
आणि वाऱ्याच्या बियांचं रोपण झालं.

पहिल्या सूर्योदयालाही शपथपूर्वक
मी नव्हतों, जेव्हा
झळाळलं विश्वअस्तित्व; आणि
नव्हतोंच जेव्हा पहिली पाऊलवाट
निघाली दिशांच्या गवतांतून.

आणि मी मातींतही नव्हतों,
हुंकारत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३०६
२१५४१ क्रांती
ग्रंथ . शाखा . स्थळ प्रत

## हृदयांतून

हृदयांतून सरकणाऱ्या काळयाभोर सावल्या
निनावी पक्ष्यांच्या, चरत जळत जातात;
दिवस विघडलेले भुसा होऊन आसमंतभर;
दिशांना भगें पडलेलीं. डोळयांतून धूसर
हलतात संध्याकाळच्या पाण्यावरले वेळूंतील सूर.
पक्ष्यांना पंख नाहीत. ते सरकतात
दबा धरल्यासारखे. माझें आयुष्यच
त्यांच्याकडे गहाण पडल्यासारखा मी
मुकाट त्यांना शोषूं देतों माझे संकल्प,
उमेद आणि अस्तित्व;
पंख हलवून तरीही उडूं बघतों दिशांपार,
हृदयांतून पल्याड.

## वादळ

आवर्जून सांगावं असं
माझ्याकडे कांही नव्हतंच ?
तूं म्हणालीस : वादळ आलं,
झाडं झोडपलीं, मोडलीं;
तें वादळत दिशांकडून आलं आणि
दिशांकडें गेलं;
आणि झाडं झोडपून मोडून गेलं.

ते गेलं आणि आलं केव्हा
आणि त्यानं काय केलं,
हें वादळाइतकंच मलाही
ठाऊक नाहीय.

आवर्जून सांगण्याइतकं होतंही;
आणि वादळ सामावून मी
तुझ्यासमोर दिगंबर.

## पाऊस

पाऊसपाऊसपाऊस :
दमट दमदार पाऊस;
गोकर्णीच्या वेलीवर पाऊस
कर्पिलाला झोडत.

पाऊसपाऊसपाऊस :
असोशीच्या नवसासारखा
तेरड्यावर
भेंडीचिटकीमिरचीभोपळ्यावर.

छपराखाली
भिजलेला घरव;
पाली मुकाट वाश्यावर

कुसरुडे
अंग धरलेले,
काडू मातींत.

पाटांतून
सुळेखवळेकाळुंद्र्याडेमके
मसाल्याचा वास : पाऊस,
पाऊस,
पाऊस.

## विनाशी

जेव्हा आपण चालत असतों रस्त्यावरून,
आणि बोलतों परस्परांशी स्वाभाविक;
निगडित असतों आपण
वाळूंत, समुद्रकिनाऱ्यावर,
वाऱ्यांच्या वेळूंत;
आणि दिशांना लपेटून भरतीला.

संध्याकाळ होते,
समुद्रांत सूर्य बुडतो,
ढगांची देदीप्यमान आरास.

वाळूंत समुद्रकिनाऱ्यावर
मी हरवतों, विनाशी
हातांचा आधार सांडून.

## तूं-मी

तूं-मी
माती आणली.
बी आणलं.
कुंडींत रोवलं.
त्याचं रोप झालं.
वाढलं.
त्याला पानंफुलं आलीं.
आणि फळं एकदोन.
नंतर तें मेलं.

तूं-मी
दोघे एका कुंडींत उभे.
पायांखाली उसनी माती.
आपलं घराणं नसलेली आणि
पृथ्वीहून अलग.

आपल्यालाही
पानं आलीं.
आपण फुललों-फळलों.

## पहाटे पहाटे

माझं जगण्याचं धैर्य संपलं.
आणि इच्छांसारखं कृतघ्न मरण
जवळ जवळ मृगजळापेक्षा
लांबत चाललंय सरत्या उन्हांतून
पूर्वेला.

अंथरलेल्या कुरकुरीत पातेऱ्यावर
मी पडलोंय,
श्वास घेतांनाही थरथरणाऱ्या
दिशांना तो जाणवतो;
आणि वारे खुबळतात रात्रींत

पातेऱ्यावर पहाटे पहाटे
दव पडलं जें—
माझ्या सुकलेल्या जिभेवरही पडलं.

# ती

खुर्चीवर बसून फाटकापासून
तिला मी पहातोंय.
ती येतेय सभोवार नजर चुकवीत.
पायांखाली ती थरथरतेय,
चेहऱ्यावर तेच भाव पूर्वीचे :
वास्तुमात्राच्या आपलेपणाचे.

ती आली सरळच माझ्यासमोर.
उभी राहिली नुसती.
मीही हललों बोललों नाही;—नंतर
जांभई दिली.

उन्हांत वाळलेल्या शेंगेसारखी
ती तडकली सर्वांगाने;
तडफडली नाही.
चेहऱ्यावर तेच भाव पूर्वीचे.

फाटकाचं दार लावल्याचा आवाज झाला,
आणि मी डोळे उघडले.

## वीज

मी घरांत बसलेला;
खिडक्यादारं लावून,
गुडुप.
बाहेर पावसाचीं पावलं वाजताहेत...
छपरांतून एकदोन थेंब जवळपास अंगावरदेखील;
पण मी उठलों नाही,
दारंखिडक्या उघडल्या नाहीत,
कान गच्च करून श्वासदेखील थांबवला,
ऐकलं नाही सरसरल्या वाऱ्याला—
अंगावर पांघरूण ओढून घेतलं,
गुडुप.

लक्कन् कांहीतरी हललं,
काळजांत
अस्वस्थतेसारखं.
ती वीज होती काय ?
तें पूर्वीपासूनच तिथं दबा धरून बसलेलं असावं;
मी ढवळलों आसमंतभर,
उठलों अद्‌भुत संचारल्यासारखं अंगांत.

बाहेर काळोख होता गडद आणि
आसमंतांतील सारं सारं मला दिसत होतं.

## तूं

आणि तूं जमूं नकोस
ढगासारखी
माझ्या आयुष्यभरावर, आणि
सूर्योदयालाच कोमेजूं नकोस
गुलबक्षीच्या फुलांसारखी, आणि उसासत
राहूं नकोस,
जें होणारच नाही त्याच्यासाठी.

तूं फुलं माळ.
आणि माझ्या आयुष्याला
आधार होऊं नकोस

ईश्वरासारखी.

## जन्म

पाळंमुळं उचकून तें निघालंय.
रक्तबंबाळ माझी माती मी ढिलीढिली होऊं देतोंय.
दिशांपार मी त्याला शोधलं.
जवळीक त्यानंच केली.
चोचींत पाणी टाकलं आकाशभर.
हृदयांत बसलं डसून. मुळापाळाबरोबर तें
माती उकलणारच हें मीं मुळं रोवून घेण्यापूर्वी
जाणलं होतं.

एक माझा जन्म मुळं—
पाळं उखाळून निघालाय.

## उभार

उभारण्याची ताकद माझ्यांत आहे,
उभार जोपासण्याची नाही;
कित्येक बहर माझे मला कळलेच नाहीत,
कित्येक रस्त्यावर सांडले—सांडवले.

ज्या आकाशाखाली मी कविता लिहिल्या,
त्याने आपले रंग बदलले
त्याच्या मनाजोगते.

चिवारीच्या बेटांतून जे वारे वाहिले,
ते माझ्या श्वासाला विसरले.
सूर्यसाक्ष एकही किरण वाऱ्याचा
माझ्या हृदयांतून चिवारींत
वाजला नाही.

उभार माझ्यांत आहे;
आकाश आणि वारे
उभारण्याची वाट बघायची ताकदही.

## कृष्णकमळ

कृष्णकमळाचे दोन वेल
एका मुलीनं मला दिले. म्हणाली,
एकत्र लावा म्हणजे जगतील;
सोबत एकाची एकाच्या
एकटेपणाला.

एक मेलं,
एक तगलं. पहिल्या पाच पानांतलीं चार
गळालीं.
नंतर सुईएवढा कोंभ आला
खालच्या खोडाच्या बेंबीवर.
वाढला. दोनतीनचार पानंपानं
फुटत गेलीं. वरचा भाग वरून
वाळत चाललेला. बाधा होऊं नये
म्हणून कात्रीने वरच्यावर कापला.
स्वच्छ उन्हांत पानं कशीं
लवलवलीं.

सकाळींच कावकाव कावळा
कृष्णकमळाच्या नेमक्या त्याच फांदीवर
झेप घेऊन बसला.
पानं मोडून बहुधा त्यानं खालीं असावींत.
मागमूस फक्त पानांच्या टणक
देठांचा होता.

नंतर
कृष्णकमळ
पहिलं जून पान पसरून तस्संच

वरून करपत राहिलं.
आता मुळापर्यंत हें असंच करपणार काय ?

दोनचारदहा दिवस
गेले.
मीं पाणी घातलं रोज.
कृष्णकमळावर हात फिरवीत राहिलों.

आणि अचानक
अल्लद मुळांतूनच आल्यासारखा
सुईदार कोंभ मातीलगत डोकावला.

कुंडी उचलली.

REFBK-0021641
REFBK-0021641

२३०६
२१५४७ काव्य

कवितासंग्रह

अनिल
इंदिरा
कांत
दिलीप पुरुषोत्तम चित्रे
अंजली ठकार
वसंत आबाजी डहाके
ना० घ० देशपांडे
म० म० देशपांडे
पद्मा
आरती प्रभू
बा० भ० बोरकर
सुरेश भट
बा० सी० मर्ढेकर
शरच्चंद्र मुक्तिबोध
शंकर रामाणी
पुरुषोत्तम शिवराम रेगे
पद्मा लोकूर
शरद साटम

यांचे

मौज
प्रकाशन